# महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती

# (२०२४-२०२५)

## (पंधरावी महाराष्ट्र विधानसभा)

## पुणे येथील वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणाच्या अनुषंगाने राज्यात महिलांवरील अत्याचार तसेच हुंडाबळी प्रकरणाबाबत

# पहिला अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक        जुलै, २०२५ रोजी
सादर करण्यात आला.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०२५

# महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती

# (२०२४-२०२५)

## (पंधरावी महाराष्ट्र विधानसभा)

### पुणे येथील वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणाच्या अनुषंगाने राज्यात महिलांवरील अत्याचार तसेच हुंडाबळी प्रकरणाबाबत

## पहिला अहवाल

## महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती

## (सन २०२४-२०२५)

**समिती प्रमुख**

१. श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स.

**समिती सदस्य**

२. श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.

३. श्रीमती विद्या ठाकूर, वि.स.स.

४. ॲड. श्रीजया चव्हाण, वि.स.स.

५. श्रीमती स्नेहा दुबे, वि.स.स.

६. श्रीमती रंजना जाधव, वि.स.स.

७. श्रीमती मंजुळा गावित, वि.स.स.

८. श्रीमती सरोज अहिरे, वि.स.स.

९. श्रीमती सना मलिक, वि.स.स.

१०. श्री.महेश सावंत, वि.स.स.

११. डॉ.ज्योती गायकवाड, वि.स.स.

१२. श्रीमती चित्रा वाघ, वि.प.स.

१३. डॉ.प्रज्ञा सातव, वि.प.स.

१४. श्री.सुनिल शिंदे, वि.प.स.

१५. श्री.किरण सरनाईक, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

१६. डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्रीमती मेघना तळेकर, सचिव-२

(२) श्री.दामोदर गायकर, अवर सचिव (समिती)

(३) श्रीमती प्रज्ञा उघाडे, कक्ष अधिकारी.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| (१) | प्रस्तावना | (सात) व (आठ) |
| (२) | अहवाल | १ ते १० |
| (३) | समितीचे अभिप्राय व शिफारशी | ११ ते २० |
| (४) | परिशिष्ट "अ" -<br>(१) महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेली माहिती<br>(२) गृह विभागाकडून प्राप्त झालेली माहिती | २१ |
| (५) | परिशिष्ट "ब" - बैठकींची उपस्थिती | ३५ |


-------

## प्रस्तावना

मी, महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीची समिती प्रमुख, समितीने आपल्या वतीने अधिकार दिल्यावरून समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

"दिनांक २६ मे, २०२५ रोजी झालेल्या अंतर्गत बैठकीत महिलांवर होणारे अत्याचार, हुंडाबळी तसेच पुणे येथील वैष्णवी हगवणे मृत्यूप्रकरणी चर्चा करून त्याबाबत सविस्तर माहिती घेण्याचे ठरविले. त्यानुसार सचिव, गृह विभाग, सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव, राज्य महिला आयोग तसेच इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने सोमवार, दिनांक ९ जून, २०२५ रोजी दुपारी १२-३० वाजता बैठक आयोजित करून महिलांवर होणारे अत्याचार, हुंडाबळी तसेच वैष्णवी हगवणे मृत्यूप्रकरणी सविस्तर माहिती दिनांक ५ जून, २०२५ रोजीपर्यंत या सचिवालयास पाठविण्याबाबत दिनांक २८ मे, २०२५ रोजीच्या पत्रान्वये गृह आणि महिला व बालविकास विभाग, मंत्रालय यांना अवगत करण्यात आले. दिनांक ५ जून, २०२५ रोजी गृह विभागाकडून तसेच दिनांक ६ जून, २०२५ रोजी महिला व बालविकास विभागाकडून वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणाबाबत माहिती प्राप्त झाली. विभागांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ९ जून, २०२५ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत सचिव, महिला व बालविकास विभाग आणि प्रधान सचिव, गृह विभाग, सचिव, राज्य महिला आयोग तसेच इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेण्यात आली. गृह आणि महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेली माहिती व साक्षीच्या वेळी उपलब्ध झालेल्या माहितीवर सखोल चर्चा करून तसेच सर्वंकष विचार करून त्यासंदर्भात समितीने आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

साक्षीच्या वेळी प्रधान सचिव, गृह विभाग, सचिव, महिला व बालविकास विभाग, सदस्य सचिव, राज्य महिला आयोग तसेच संबंधित विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर उपस्थित राहून समितीस आवश्यक ती माहिती देऊन सहकार्य केल्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीच्या प्रदीर्घकाळ चाललेल्या बैठकीच्या वेळी आपला अमूल्य वेळ देऊन समिती सदस्यांनी ज्या आस्थेने व तत्परतेने हे काम पूर्ण करण्यास सहकार्य दिले त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानते.

समितीने दिनांक १६ जुलै, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत प्रारूप अहवालावर विचार करून तो काही सुधारणांसह संमत केला.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक १६ जुलै, २०२५.

**श्रीमती मोनिका राजळे,**
समिती प्रमुख,
महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती.

# १

## अहवाल

महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीस श्रीमती वैष्णवी हगवणे यांच्या मृत्यू प्रकरणासंदर्भात प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने सचिव, महिला व बालविकास विभाग व प्रधान सचिव, गृह विभाग यांची दिनांक ९ जून, २०२५ रोजी साक्ष घेण्यात आली.

पुणे येथे घडलेल्या श्रीमती वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणाची वस्तूनिष्ठ माहिती समितीस द्यावी. आतापर्यंत या केसमध्ये काय काय झाले आहे, महिला आयोग, गृह विभाग यांनी आतापर्यंत या केसच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली ? भविष्यात अशा घटना होऊ नयेत यासंदर्भात आपली कोणती भूमिका आहे, स्पेसिफिक या प्रकरणामध्ये आतापर्यंत झालेल्या प्रगतीबाबत समितीला अवगत करण्याबाबत निदेशित केले असता विभागाने खालीलप्रमाणे माहिती दिली :—

दिनांक १७ मे, २०२५ रोजी श्रीमती वैष्णवी हगवणे यांच्या हुंडाबळीच्या अनुषंगाने २०६/२०२५ गुन्हा नोंद झाला. यामध्ये भारतीय न्याय संहितेच्या कलम ८०(२), १०८, ११५ (२), ३५२, ३५१ (२), ११८ (१), ३ (५), ६१ (२), २४९ (ब), ८५, ४९, जे.जे. ॲक्ट, २०१५ चे कलम ७५, ८७ प्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे. तसेच, जुन्या कायद्यातील सेक्शन ३०४ (ब), ३०६, ३२३, ५०४, ५०६, ३२४, १२० (ब), २१२, ४९८ (अ) व सेक्शन १०९ प्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे. या केसमधील फिर्यादी श्रीमती वैष्णवीचे वडील श्री.अनिल साहेबराव कस्पटे हे आहेत. त्यांच्या फिर्यादीवरून सुरूवातीला ५ आरोपींच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला.

ही घटना १६ मे, २०२५ या तारखेला घडली. या घटनेचा दिनांक १६ मे, २०२५ रोजी १६ वाजून ४४ मिनिटांनी आमच्याकडे रिपोर्ट झाला. चेलाराम हॉस्पिटल या ठिकाणाहून ती बेशुद्धावस्थेत असल्याबाबतचा मेमो प्राप्त झाला. त्याबाबत स्टेशन डायरीमध्ये नोंद करण्यात आली. महिला सहायक पोलीस निरीक्षक, श्रीमती तांबे या तत्काळ चेलाराम हॉस्पिटलला गेल्या. त्याठिकाणी सीपीआर ट्रिटमेंट करण्यात आली. सायंकाळी ५.४० च्या आसपास तिला मयत घोषित करण्यात आले. ही नवविवाहितेची आत्महत्या असल्याने सुरूवातीला औंध सिव्हिल हॉस्पिटल याठिकाणी शवविच्छेदनासाठी शव पाठविले होते. दिनांक १६ मे, २०२५ रोजी घटनास्थळ पंचनामा करण्यात आलेला आहे. तत्काळ एसीपी यांनी एक आदेश काढला की, दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांसमक्ष व इन कॅमेरा शवविच्छेदन व्हावे. इन्क्वेस्ट इन कॅमेरा व्हावे त्यामुळे औंधवरून शव ससून येथे हलविले. त्यानंतर दिनांक १७ मे, २०२५ रोजी इन कॅमेरा इन्क्वेस्ट पंचनामा झालेला आहे. इन कॅमेरा शवविच्छेदन झालेले आहे. दिनांक १६ मे, २०२५ रोजीच्या घटनेच्या अनुषंगाने अकस्मात मृत्यू नोंदणी क्रमांक ६९ दाखल आहे. या अकस्मात मृत्यूच्या तपासानंतर दिनांक १७ मे, २०२५ रोजी मुलीकडचे नातेवाईक पोलीस स्टेशनला तक्रार द्यायला आले. ते आल्याआल्या तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

या गुन्ह्यामध्ये सुरूवातीला मयताचा नवरा, सासू, सासरे, दीर व नणंद असे ५ आरोपी होते. या ५ आरोपींपैकी ज्या दिवशी गुन्हा दाखल झाला, त्या दिवशी नवरा, सासू व नणंद या तिघांना तत्काळ अटक करण्यात आली आहे. यातील उर्वरित २ आरोपी फरार झालेले होते. त्यांना २३ तारखेला सकाळी अटक

करण्यात आली. या आरोपींना फरार असतानाच्या कालावधीत ज्यांनी ज्यांनी आश्रय दिला, असे ५ लोक तपासात निष्पन्न झाले. त्या पाचही जणांना अटक करण्यात आलेली आहे. हगवणे कुटुंबाचा कौटुंबिक स्नेही, मित्र श्री.निलेश चव्हाण याच्या बरोबर श्रीमती वैष्णवीच्या नणंदेचे म्हणजे श्रीमती करिश्माचे लग्न होणार होते. त्याचा या गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्यामुळे त्याला या गुन्ह्यात नेपाळ बॉर्डरवरून अटक करण्यात आली. आतापर्यंत या गुन्ह्यात तब्बल ११ आरोपींना अटक झालेली आहे. या गुन्ह्यात ३०४ (ब) हा मुख्य भाग होता.

समितीस असेही अवगत करण्यात आले की, श्रीमती वैष्णवीचे लग्न दिनांक २८ एप्रिल, २०२३ रोजी झालेले आहे. त्या दोघांचे पहिल्यांदा एकमेकांवर प्रेम होते. घरच्यांच्या मध्यस्थीने प्रेमविवाह अरेंज मॅरेजमध्ये कन्व्हर्ट झालेला आहे. टिळ्याचा कार्यक्रम माहे जानेवारी, २०२३ मध्ये झाला. त्यानंतर लगेचच श्रीमती वैष्णवीच्या घरच्यांनी हुंड्याची मागणी केली. हुंड्यामध्ये ब्रँडेड गाडी, चांदीची भांडी व ५१ तोळे सोने पाहिजे असे सांगितले गेले. लग्न ठरलेले असल्यामुळे ब्रँडेड गाडीच्या मागणीबाबत श्रीमती वैष्णवीच्या कुटुंबियांना माघार घेता आली नाही. लग्न ठरल्यानंतर त्यांनी ब्रँडेड गाडी एमजी हेक्टर बुक केली. हे जेव्हा नवऱ्या मुलाला समजले तेव्हा त्याने सांगितले की, मला एमजी हेक्टर गाडी नको. फॉर्च्युनर गाडी असेल तरच मी लग्नाला उभा राहीन. तपासादरम्यान एमजी हेक्टर गाडीसाठी दिलेल्या ॲडव्हान्स ५० हजार रुपयांचे कागदपत्र हस्तगत करण्यात आलेले आहेत. जी फॉर्च्युनर गाडी बुक केली, त्या फॉर्च्युनर गाडीकरिता श्री.अनिल कस्पटे व त्यांच्या पत्नी या दोघांच्या अकाऊंटमधून पैसे गेलेले होते. त्या पैशांच्या बाबतीत त्यांची एनओसी होती की, गाडी माझ्या मुलीच्या नावाने बुक करावी. ते कागदपत्र हस्तगत करण्यात आलेले आहेत. त्या दोन्ही सेल्समन एजंटचे स्टेटमेंट हस्तगत करण्यात आलेले आहे. हुंड्यापोटी दिलेली फॉर्च्युनर गाडी तसेच एक ॲक्टिवा गाडी ही दोन्ही वाहने जप्त करण्यात आलेली आहेत. हुंड्यामध्ये दिलेली चांदीची भांडी जप्त करण्यात आलेली आहेत. जे ५१ तोळे सोने दिले होते ते फेडरल बँकेमध्ये गहाण ठेवून त्यावर गोल्ड लोन केले होते. ते गोल्ड लोन डिसबर्स झालेले आहे. त्या गोल्ड लोनचे अकाऊंट आम्ही फ्रिज केले आहे. त्याबाबत माननीय न्यायालयाला कळविलेले आहे.

ज्या दिवशी मयत घटना घडली, त्या दिवशी दिनांक १६ मे, २०२५ रोजी या नवरा बायकोच्या भांडणात मयत हिस मारहाण होत असताना पाहणारी कु.शुभांगी नावाची एक ९ वर्षांची मुलगी आहे. तसेच, घरी काम करणाऱ्या दोन कामगार आहेत. त्या तिघांचेही स्टेटमेंट झालेले आहे. हुंडा देणे, तिचा छळ, जाच, त्याबाबतीत वेळोवेळी घरी जे सांगितले होते त्या अनुषंगाने घरच्यांचे स्टेटमेंट्स झालेले आहेत. त्यांचे सीडीआर काढण्यात आलेले आहेत.

ही घटना घडण्यापूर्वी माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये श्रीमती वैष्णवी हगवणे स्वतःच्या माहेरी कस्पटे वस्ती, वाकड या ठिकाणी असताना नवरा तिच्या चारित्र्यावर वेळोवेळी संशय घ्यायचा. तू कोणाबरोबर फिरते, कुठे फिरते, तिथले लोकेशन टाक, फोटो टाक, अशा पद्धतीने फोनवर त्या दोघांचे वाद झाले होते. माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये श्रीमती वैष्णवीने रॅट पॉयझन घेतले होते. त्यावेळेस ती एम्स हॉस्पिटल, पुणे या ठिकाणी ४ दिवस ॲडमिट होती. ते कागदपत्र हस्तगत करण्यात आलेले आहेत. त्यावेळेस तिने नवऱ्याने अशा पद्धतीने

वाद घातला म्हणून मी उंदराचे औषध भातात कालवून घेतलेले आहे, असे सांगितले होते. परंतु, आता माझी कोणाविरुद्ध तक्रार नाही, अशा पद्धतीचे तिचे स्टेटमेंट वाकड पोलीस स्टेशनमध्ये झाले होते, ती संपूर्ण कागदपत्र हस्तगत करण्यात आलेली आहेत.

या संपूर्ण तपासामध्ये असे आढळून आले की, घटनास्थळी म्हणजे श्रीमती वैष्णवी हगवणेच्या घरात एकूण ७ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे होते. दिनांक १६ मे ,२०२५ रोजीची घटना त्या सीसीटीव्हीमध्ये पूर्ण कैद झालेली आहे. १६ तारखेचा सीसीटीव्हीचा क्रोनॉलॉजीकल सिक्वेन्स काढलेला आहे. त्या सिक्वेन्सनुसार ज्या दिवशी घटना घडली, त्या दिवशी मयताची सासू, नणंद व दीर हे सकाळी साडेनऊ वाजता मंचर या ठिकाणी त्यांचा एक नातेवाईक मयत झाला होता तेथे गेले होते. त्यांच्या सोबत श्रीमती वैष्णवी हगवणेची आईसुद्धा मंचर या ठिकाणी गेली होती. नवरा व श्रीमती वैष्णवी हगवणे या दोघांचे भांडण झाले त्यावेळेस घरामध्ये सासू श्रीमती लता हगवणे यांची ८२ वर्षाची आई हजर होती. ज्यावेळेस यांची मारामारी सुरू होती, तेव्हा कु. शुभांगी नावाची ९ वर्षाची मुलगी हजर होती. तिने त्याबाबत सांगितलेले आहे. त्यानंतर श्रीमती वैष्णवी हगवणेचा नवरा व सासरे हे एका लग्नासाठी बाहेर गेले. बाहेर गेल्यानंतरचा जो कालावधी आहे, त्यात श्रीमती वैष्णवी हगवणे सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये घरातून बाहेर येताना दिसते. मुलाला दिसते. आजीच्या खोलीत जाताना दिसते. ते लग्नाहून परत येण्यापर्यंतचा जो २०-२५ मिनिटांचा कालावधी आहे. त्या कालावधीत तिने गळफास लावून घेतलेला आहे.

यामध्ये इन कॅमेरा शवविच्छेदन झालेले आहे. सेलोफेन टेप नावाची एक टेस्ट आहे. या टेस्टसाठी गळ्याकडचे सॅम्पल काढून ठेवलेले होते. व्हिसेरा व सेलोफेन टेपचे सॅम्पल सी.एं.कडे पाठविण्यात आले. सी.एं.चा अहवाल प्राप्त करून घेण्यात आला. त्या सेलोफेन टेपमध्ये गळ्याभोवती लागलेले साडीचे पिवळ्या, काळ्या, पांढऱ्या कलरचे फायबर्स अस्तित्त्वात असल्याबाबतचा अहवाल देखील प्राप्त झालेला आहे.

व्हिसेरा अहवालामध्ये कोणत्याही प्रकारचे पॉयझन नाही, अशा प्रकारचा अहवाल प्राप्त झालेला आहे. आता फायनल कॉज ऑफ डेथ घेणे बाकी आहे. तपास प्रगतीपथावर आहे. यात जेवढे आरोपी निष्पन्न होते त्या सर्व आरोपींना अटक झालेली आहे. जेवढे महत्त्वाचे साक्षीदार होते, त्या सर्व साक्षीदारांचे स्टेटमेंट झालेले आहे. सीसीटीव्ही कॅमेरा फुटेज जतन करून ते देखील FSL ला पाठवलेले आहे. सर्वांचे मोबाईल होते. त्यातील प्रत्येकाचे संभाषण, त्यातील श्रीमती वैष्णवी हगवणे व श्री.शशांकच्या ६४ चॅटिंगचे स्क्रीन शॉट सायबर तज्ञां मार्फत हस्तगत केलेले आहेत. तरी देखील एक्स्ट्रा चॅटिंग वगैरे होती का, यासाठी मोबाईल फॉरेन्सिक विभागाकडे पाठवून दिलेले आहेत.

यावर समितीने, पोलीस विभागाचे अधिकारी श्री.सुपेकर यांच्या पत्नीच्या खात्यावर दीड लाख रुपये आहेत. श्री.सुपेकर यांची एक ऑडिओ क्लिप व्हायरल झाली होती. ते एका अधिकाऱ्याला असे सांगत आहेत की, ''याच्यात माझे नाव का घेतले, माझे नाव घेऊ नका, याच्यात मला कशाला अडकवत आहात...'', त्याची

आपण फॉरेन्सिक चाचणी केली का ? हा त्यांचाच आवाज आहे का ? ते कोणाशी बोलले, तो पोलीस अधिकारी कोण होता, त्याची सत्यता तपासली का ? पोलीस महासंचालक मॅडम तो अधिकारी गृह विभागाचा आहे. त्याच्या पत्नीवर तुम्ही काय ॲक्शन घेतली? रुखवत आईवडील मुलीच्या लग्नात बनवून देतात. मुलीच्या लग्नात आईने, मावश्यांनी, माम्यांनी सर्वांनी ते बनवून ठेवलेले असते. त्यासाठी कोणी पैसे मागत नाही. तुम्ही आम्हाला पैसे द्या मग आम्ही तुम्हाला रुखवत बनवून देतो, असे समितीने कुठेच ऐकलेले नाही. या दीड लाख रुपयांबाबतचा एक प्रश्न आहे. एक लाख रुपयांची श्री.सुपेकर यांच्या पत्नीच्या खात्यामध्ये एंट्री आहे आणि ५० हजार रुपयांची कॅश, यावर गृह विभागाने काय ॲक्शन घेतली? हा देखील एक हुंड्याचा भाग आहे. श्री.सुपेकर यांच्या पत्नीला बोलावले का, त्या ऑडिओ क्लिपची सत्यता गृह विभागाने तपासली आहे का, तपासली असल्यास त्याचा अहवाल शासनास पाठविला आहे का ? असा प्रश्न विभागास केला असता, विभागामार्फत या मुद्यांची आजच्या बैठकीच्या अनुषंगाने विभागामार्फत याची चौकशी करण्यात येईल, असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

हे प्रकरण सध्या खडक पोलीस स्टेशनला वर्ग केलेले आहे का? अशी पृच्छा समितीने केली असता, विभागाने नकारात्मक उत्तर दिले. या गुन्ह्यामध्ये एक थार गाडी जप्त आहे. या थार गाडीचा मालक श्री.चौंदे यांच्या पत्नीने कलम ४९८ अन्वये खडक पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे. समितीने जो एक लाख रुपये ट्रान्सफरबाबतचा मुद्दा मांडलेला आहे त्याचा विभागामार्फत सखोल तपास करण्यात येईल, ते निश्चितपणे गुन्ह्यात ॲड करू असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

समितीने २-३ मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यापैकी काही मुद्दे समितीला माहिती आहेत व काही मुद्दे माहिती नाहीत. त्यात श्री.सुपेकर यांचा देखील विषय आहे. विभाग चांगले काम करीत असला तरी तपासामध्ये नातेवाईकासंबंधी काही मुद्दे आलेले आहेत. त्याबाबत समिती अनभिज्ञ आहे. या संदर्भात गृह विभागाच्या सचिवांना सविस्तर उत्तर देण्यास सांगितले असता श्री.सुपकेर यांची आता आय.जी.होमगार्ड या पदावर बदली झालेली आहे. या संदर्भातील गृह विभागाकडून माहिती घेण्यात येईल. तसेच सन्माननीय सदस्यांनी खडकवासला पोलीस स्टेशनमधील केससंबंधी उल्लेख केला. श्री.सुपेकर यापूर्वी आय.जी. कारागृह या पदावर कार्यरत होते. त्यांच्या संदर्भात काही चौकशी प्रस्तावित झाली आहे का, याबाबत कारागृहासंबंधी असलेले प्रधान सचिव यांच्याकडून माहिती घेण्यात येईल, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वस्त केले श्रीमती मयुरी हगवणे यांना त्यांच्या सासरच्या लोकांकडून मारहाण व विनयभंग करण्यात आला होता. त्याबाबत त्यांनी दिनांक ५ नोव्हेंबर, २०२४ रोजी रात्रीच्या वेळी पौंड पोलीस स्टेशन येथे तक्रार केली होती. त्याच दिवशी सदर प्रकरणी एफआयआर दाखल करण्यात आला. सदर प्रकरणी ननंद आणि भावजई असा क्रॉस गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर प्रकरणी आमच्या येथील कार्यरत असलेल्या महिला अधिकाऱ्यांकडे तपास देण्यात आला. त्याच दिवशी त्यांची वैद्यकीय तपासणी, घटनास्थळाचा पंचनामा करून साक्षीदारांचे स्टेटमेंट घेण्यात आले. सदर प्रकरणी त्यांचे कपडे फाडल्याबाबत तक्रार करण्यात आली

होती. ते कपडे जप्त करण्यात आले. तसेच न्यायालयामध्ये त्यांचे स्टेटमेंटदेखील नोंदवून घेण्यात आले. त्यानंतर भारतीय न्याय संहिता ३५ नुसार आरोपींना नोटीस देऊन बोलाविले जाते. त्यानुसार संबंधितांना नोटीस देण्याची कारवाई देखील केली आहे. सदर प्रकरणी दोन्ही बाजूकडून तक्रार करण्यात आल्यामुळे क्रॉस तक्रार होती. सदर प्रकरण मिटवायचे असल्यामुळे एक-दोन वेळा दोन्ही बाजूकडून तसे सांगण्यात आले होते. सदर तक्रार मागणी किंवा हुंडाबळीची नव्हती. एका भावाकडे जेसीबी होता व एका भावाकडे वॉशिंग सेंटर होते. त्यामधील पैशावरून त्यांच्यामध्ये वाद निर्माण झाला होता. सदर प्रकरणामध्ये एफआयआर दाखल करण्यात आली होती. त्यानंतर गावे ट्रान्सफर झाल्यामुळे गुन्ह्यांमधील पेपरदेखील ट्रान्सफर करण्यात आले. सदर प्रकरणी दोषारोपपत्रदेखील दाखल झालेले आहे. सदर केसमध्ये महिला पोलीस अधिकारी तपास अधिकारी आहेत, असे अवगत केले.

समितीने सदर प्रकरणी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यास सांगितले असता आयोगाच्या सदस्यांनी खालीलप्रमाणे माहिती समितीस विदित केली.

श्रीमती मयुरी जगताप यांच्या आई श्रीमती लता जगताप व त्यांचे भाऊ यांनी दिनांक ६ नोव्हेंबर, २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे तक्रार अर्ज केला होता. सदर अर्जामध्ये हुंड्याकरिता मारहाण करतात व फॉरच्युनर गाडीची मागणी करीत असल्याचे त्यात नमूद केलेले आहे. दिनांक १८ फेब्रुवारी, २०२४ रोजी पोलीस स्टेशनमध्ये एनसी दाखल केली होती. परंतु पोलिसांनी त्यात मध्यस्थी करून प्रकरण मिटवले. त्यानंतर देखील त्रास कमी झाला नाही व त्यांना सातत्याने मारहाण होत राहिली. तसेच श्रीमती मयुरी जगताप यांचा तक्रार अर्ज दिनांक ७ नोव्हेंबर, २०२४ रोजी पौंड पोलीस स्टेशनकडे पाठविलेला आहे. महाराष्ट्र राज्य महिला आयोग ही Independent Autonomous Body आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे एखादी तक्रार प्राप्त झाल्यानंतर सदर तक्रार संबंधित एजन्सीकडे पुढील कार्यवाही करण्यासाठी पाठविली जाते. त्यानंतर सदर प्रकरणी अहवाल आल्यानंतर चौकशी करून ते प्रकरण बंद केले जाते. श्रीमती वैष्णवी हगवणे प्रकरणासंबंधी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे कोणीही तक्रार केली नव्हती. परंतु सदर प्रकरणी मीडिया व वर्तमानपत्रांमध्ये आलेल्या बातम्यांनुसार महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने श्रीमती वैष्णवी हगवणे प्रकरणी १९ नोव्हेंबर, २०२४ रोजी सुमोटो गुन्हा दाखल केला व सदर प्रकरण पुढील कार्यवाही करण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये पाठविले.

त्यानंतर समितीने भरोसा सेलचे उत्तरदायित्व कोण तपासते ? अशी पृच्छा करून भरोसा सेलबाबत माहिती सादर करण्याबाबत निदेशित केले असता, प्रत्येक युनिटमध्ये एक भरोसा सेल असतो. ते डायरेक्ट गुन्हे शाखेच्या पर्यवेक्षणामध्ये काम करते. आयुक्तालयात इन्स्पेक्टर रँकचे अधिकारी असतात. ते भरोसा सेलचे पूर्ण काम पाहतात. प्रत्येक महिन्यात किती केसेस तेथे आल्या त्याचा अहवाल येतो. त्यात काय निष्पन्न झाले हे सर्व तपशील त्यांच्याकडून येतात. प्रत्येक बैठकांमध्ये याचे पुनरावलोकन होते. शहरी भागात तो नॉर्मली सेंट्रलाईज्ड असतो व तो सी.पी. ऑफिसमध्येच असतो. त्याचा नियमित पाठपुरावा घेतला जातो. बऱ्याच प्रकरणांमध्ये विभागामार्फत त्यांचे समुपदेशन करून त्यांना एकत्र आणतात. काही प्रकरणामध्ये सहमत

झाले नाहीत तर प्रथम माहिती अहवालात नोंद होते. आपण त्या सर्वांचा हिशोब ठेवतो व त्याचा पाठपुरावा करतो. ते एकत्र येऊ शकणार नाहीत असे वाटले की, प्रथम माहिती अहवालात नोंद केली जातो. प्रथम माहिती अहवालात थेट नोंद करण्याच्या अगोदर भरोसा सेलच्या माध्यमातून त्यांचे समुपदेशन करतो. नॉर्मली सहायक पोलीस निरीक्षक (ए.पी.आय.) किंवा पोलीस निरीक्षक (पी.आय.) दर्जाच्या जबाबदार व महिला पोलीसांचीच निवड केली जाते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

यावर समितीने, श्रीमती मयुरी हगवणे प्रकरणामध्ये तर भरोसा सेल फेल झाले आहे. कारण त्यांनी काही केलेच नाही. ती मुलगी सांगत आहे की, मी भरोसा सेलला गेली. पोलीस स्टेशनला गेली. तिने महिला आयोगाला मेल पाठविला'', याचा अर्थ ती भरोसा सेलकडे गेली होती. ती तेथे गेली असेल तर त्याची एंट्री असेल, ती विभागाने तपासली का? हे सन २०२४ चे प्रकरण आहे. सर्वसामान्य लोकांना भरोसा सेलबाबत माहिती नसते. ती नक्की गेली असणार म्हणून तिला माहिती आहे की, हा भरोसा सेल आहे. तसे असेल तर तपासून घ्यावे. नसेल तर मग त्यावेळेस कोण होते ते पहावे. पोलीस महासंचालक मॅडम हे फार गंभीर आहे. ज्यावेळेस अशी तक्रार होती त्यावेळेस म्हणजे दि. १८.२.२०२४ रोजी मध्यस्थी करणारे कोण पोलीस अधिकारी होते ? त्यांची चौकशी झाली पाहिजे.

समितीने पुढे असेही निदर्शनास आणून दिले की, जेव्हा कौटुंबिक हिंसाचार कायदा नव्हता. त्यावेळी ४९८ कलमान्वये कारवाई केली जात होती. तेव्हा एखाद्या महिलेने अत्याचारासंबंधी तक्रार केल्यानंतर ताबडतोब सासरकडील मंडळी किंवा तिच्या पतीला अटक केली जात होती. परंतु त्यावेळी अनेक fake cases दाखल केल्या जात होत्या. अशा केसेस दाखल होऊ नयेत याकरिता कौटुंबिक हिंसाचार कायदा पारित झाला. सदर कायद्यान्वये लहान मुलीपासून वयोवृद्ध स्त्री पर्यंत संरक्षण दिले जाते. कौटुंबिक हिंसाचार कायद्यामध्ये पोलिसांनी कशा प्रकारची प्रोसिजर फॉलो केली पाहिजे याबाबत सर्व काही नमूद आहे. आम्ही जेव्हा महिलांच्या संदर्भात केसेस दाखल करण्यासाठी जातात तेव्हा पोलिसांकडून कौटुंबिक हिंसाचार कायद्यासंबंधी सांगितले जाते. विधिमंडळामध्ये कायदे पारित केले जातात. महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कौटुंबिक हिंसाचार कायदा जास्तीत जास्त मजबुत कसा करता येईल याबाबत कार्यवाही करणे अत्यावश्यक आहे. जेणेकरून पोलीस त्या कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करू शकतील. भरोसा सेलमध्ये कौटुंबिक हिंसाचार कायद्यानुसार समुपदेशन केले जाते. अनेकवेळा महिलेला तिच्या पतीकडून काळे, निळे वळ पडेपर्यंत मारहाण झालेली असते. त्यानंतर ती महिला तक्रार करण्यासाठी भरोसा सेलमध्ये गेल्यानंतर तिचे समुपदेशन केले जाते. अशा प्रकारे महिलांना त्यांच्या पतीकडून मारहाण होत असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई होणे अत्यावश्यक आहे. भरोसा सेल हे जिल्हा पातळीवर असल्यामुळे तेथे समुपदेशन केले जाते. उदाहरण सांगायचे झाल्यास जव्हारमधील कौटुंबिक हिंसाचार पीडित महिला पालघरमध्ये समुपदेशन करण्यासाठी येऊ शकत नाही. त्यामुळे कायदे तयार करीत असताना या सर्व गोष्टींचा विचार होणे अत्यावश्यक आहे. अशा प्रकारे अशी प्रकरणे पुन्हा घडू नयेत याकरिता कौटुंबिक हिंसाचार कायद्यामध्ये सुधारणा करणे अत्यावश्यक आहे. हुंड्यासंबंधी सांगायचे झाल्यास स्वतःहून गिफ्ट दिल्यास त्याला हुंडा समजू नये. महाराष्ट्रात उत्तर

भारतीय समाज मोठ्या प्रमाणावर आहे. तेथे मुलीच्या लग्नामध्ये स्वतःहून गिफ्ट दिले जातात. परंतु या संदर्भात अप्रत्यक्षरित्या कोणत्या तरी मार्गाने हुंड्याची मागणी केली जात असते. या गोष्टींना आळा घालणे अत्यावश्यक आहे. आरोपींना जास्तीत जास्त कडक शिक्षा कशी होऊ शकेल या संदर्भात गृह विभागाकडून सूचना येणे अत्यावश्यक आहे. कारण याबाबत गृह विभागाकडून अंमलबजावणी केली जाणार आहे. जेणेकरून पीडित महिलांना न्याय मिळू शकेल.

त्यावर विभागाने, ज्या महिलांवर अत्याचार होतात त्या संदर्भात भारतीय न्याय संहितेनुसार ६० दिवसांच्या आत दोषारोपपत्र दाखल करणे गरजेचे आहे. सध्याच्या परिस्थितीत अशा प्रकारचा गुन्हा झाल्यानंतर २-३ दिवसांमध्ये दोषारोपपत्र दाखल केले जाते. जेणेकरून सदर गुन्ह्यांमधील आरोपींना ताबडतोब शिक्षा होऊ शकते. प्रत्येक युनिटकडून दर आठवड्याला भरोसा सेलच्या संदर्भात त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणाची माहिती घेतली जाते. समितीने या संदर्भात ज्या सूचना केलेल्या आहेत त्यानुसार पोलीस आयुक्तांना विभागाने विनंती केली आहे की, श्रीमती मयुरी जगताप यांना बोलावून घ्यावे. तसेच त्यावेळी कोणी मध्यस्थी केली याबाबत माहिती मिळणे गरजेचे आहे. या संदर्भात पौंड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला होता. परंतु सदर महिला पुण्यामध्ये राहत आहे. त्यामुळे सदर महिला कोणकोणत्या ठिकाणी गेली होती याबाबत पोलीस अधीक्षकांकडे विचारणा करणार आहोत. याचे कारण असे आहे की, एखाद्या वेळी पत्त्यामध्ये देखील चूक होऊ असते. आता नवीन कायद्यानुसार नागपूरला गुन्हा दाखल झालेला असला तरी त्याबाबत मुंबई तसेच इतरत्र कोणत्याही ठिकाणी तक्रार करता येऊ शकते. तसेच ई-मेलवरून देखील प्रथम माहिती अहवाल दाखल केली जाऊ शकते. या संदर्भात लोकांमध्ये जनजागृती करणे अत्यावश्यक आहे. अनेकवेळा प्रकरणाचे कामकाज करण्यासाठी विशेष सरकारी वकील नियुक्त करण्याची मागणी केली जाते. महिला अत्याचारांवरील गुन्हयांची दररोज सुनावणी होणे गरजेचे आहे. नवीन कायद्यानुसार दोन पेक्षा जास्त adjournment लागल्यास त्याबाबत लेखी स्पष्टीकरण द्यावे लागते. दररोज सुनावणी व्हावी याकरिता सन २००५ मध्ये गृह विभागाकडे एक टिप्पणी सादर केली होती. सध्या ५ टक्के दोषसिद्धी दर आहे. रेप, विनयभंगाच्या केसेस १० वर्षांनंतर आल्यानंतर त्यामधील पीडित महिला किंवा मुली समोर येत नाहीत. याचे कारण त्या मुलीचे लग्न झालेले असते व ती आपल्या कुटुंबामध्ये सुखी असते. त्यामुळे अशा केसेस समोर आल्यानंतर त्या मुलीचे कुटुंबामध्ये अनेक प्रश्न निर्माण होऊ शकतात. ही बाब अतिशय महत्त्वाची आहे. महिला अत्याचारासंबंधी केस दाखल झाल्यानंतर त्या वर्षभर बोर्डवर घेऊन त्याची दररोज सुनावणी घेणे अत्यावश्यक आहे. अन्यथा दोषसिद्धी दरामध्ये वाढ होऊ शकणार नाही. परिणामी गुन्ह्यांमधील आरोपींना लवकरात लवकर शिक्षा होऊ शकणार नाही. या सर्व गोष्टी लोकांपर्यंत पोहोचणे अत्यावश्यक आहे. भरोसा सेलमध्ये पीडित महिलांचे समुपदेशन केल्यानंतर त्या महिलांची प्रत्यक्षात घरी जाऊन तिची विचारपूस करणे याबाबत मघाशी मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. परंतु भरोसा सेलमध्ये मोठ्या प्रमाणावर तक्रारी येत असतात. तसेच तेथे पोलिसांसमवेत एनजीओचे लोक देखील समुपदेशन करीत असतात. या सर्व गोष्टींचा विचार करता भरोसा सेलमध्ये पीडित महिलांचे समुपदेशन केल्यानंतर त्या महिलांची प्रत्यक्षात घरी जाऊन तिची विचारपूस करणे थोडे अवघड आहे, असे समितीस अवगत केले.

समितीने, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे मेल किंवा अन्य प्रकारे तक्रार प्राप्त झाल्यानंतर सदर तक्रार गृह विभाग तसेच पोलीस स्टेशनकडे पाठविली जाते. त्यावर कशा प्रकारे कारवाई केली जाते, त्याबाबत काही पाठपुरावा केला जातो का ? श्रीमती मयुरी जगतापने मेलद्वारे तक्रार केल्याचे येथे नमूद केलेले आहे. सदर तक्रार पोलीस स्टेशनकडे पाठविल्यानंतर त्याबाबत पाठपुरावा करण्यात आला होता का ? त्यानंतर महिला आयोगाची जबाबदारी संपली असे होत नाही. या संदर्भात पाठपुरावा केला असता तर पुढील घटना घडली नसती. श्रीमती मयुरी जगतापने केलेले आरोप गंभीर स्वरुपाचे होते. त्यांना फक्त मारहाण झाली होती असे नाही. या संदर्भात समन्वय साधणे अत्यावश्यक होते.

महिला आयोगाला १० कोटी ६० लक्ष रुपयांचा निधी देण्यात आला. इतक्या कमी रकमेत ही सर्व कामे करणे शक्य नाही. दिवसाला कमीत कमी १०० ते २०० ई-मेल येतात. हे ईमेल अटेंड करायला त्यांच्याकडे कर्मचारी नाहीत. या कार्यालयात चार कॉन्सिलर आहेत, दोन इकडे व दोन तिकडे असतात. यांचे विभागीय कार्यालय नाही, पुरेसे कर्मचारी नाहीत, आयोगावर सदस्य नियुक्ती करण्याचे काम शासनाचे आहे. परंतु गृह विभागाने त्यांना काही तरी मदत केली पाहिजे. महिला आयोगातील निम्मे कर्मचारी कंत्राटी पद्धतीवर घेण्यात आले आहेत. काही कर्मचारी प्रतिनियुक्तीवर घेण्यात आले आहेत. त्यांच्यामध्ये वाद आहे, त्यांच्याकडे पुरेसे मनुष्यबळ नाही. लोकांची अशी अपेक्षा असते की, महिला आयोगाकडे तक्रार केल्यावर तातडीने कारवाई झाली पाहिजे पण असे होत नाही कारण त्यांचे अधिकार मर्यादित आहेत. त्या अडचणी सोडविणे व त्यांच्यासाठी निधी वाढविण्याची मागणी समिती शासनाकडे व मुख्यमंत्री महोदयांकडे करणार आहे. पोलीस विभागाचे प्रमुख म्हणून त्यांच्याकडील कर्मचारी संख्येचा विचार करून त्यांना मदत केली पाहिजे. मनुष्यबळाशिवाय कामे होऊ शकत नाहीत. विभागीय कार्यालयाचे कर्मचारी वाढवून दिले पाहिजेत.

शवविच्छेदन अहवाल येण्यासाठी किती दिवसांचा कालावधी लागतो ? अशी पृच्छा केली असता, जोपर्यंत डॉक्टर अहवाल देत नाही तोपर्यंत तो मिळत नाही. शव तेथे गेल्यावर ज्यांनी शवविच्छेदन केले ते डॉक्टर अहवाल देतात. कधी कधी असे होते की, ज्या डॉक्टरांनी शवविच्छेदन केले त्यांची बदली होऊन जाते. त्या शवविच्छेदन अहवालावर तोच डॉक्टर सही करतो. दुसरा डॉक्टर त्यांच्या वतीने सही करू शकत नाही. यामध्ये भरपूर अडचणी आहेत. डायरेक्टर मेडिकल एज्युकेशनकडून हे नियम तयार केले जातात. यामध्ये जे शवविच्छेदन झाले आहे. त्या शवविच्छेदन अहवालाचा शेवट पाहिला तर त्यात असे नमूद आहे की, "Viscera and articles are preserved for chemical analysis." त्यामध्ये सर्वात महत्त्वाची डॉक्टरांकडे क्युरी केली होती की, सेलोफेन टेप टेस्टसाठी स्लाईड राखून ठेवली होती. व्हीसेरा राखून ठेवला होता. ती सेलोफेन टेप व व्हीसेरा गृह विभागाने सीएला पाठविला आहे. सीएचा अहवाल प्राप्त झाला आहे. त्या अहवालानुसार सेलोफेन टेपमध्ये साडीचे फायबर यलो, व्हाईट व ब्लॅक कलरमध्ये सापडले आहेत. व्हीसेरामध्ये नो-पॉयझन असे आलेले आहे. फायनल कॉज ऑफ डेथसाठी डॉक्टरांकडे सीएकडून आलेला अहवाल व अगोदरच्या पाठपुराव्याची कागदपत्रे पाठविण्यात आली आहेत. घटनास्थळी सात सीसीटीव्ही कॅमेरे सापडले आहेत. ते एकाच वेळी आपण डीव्हीआर लावून आऊटकट पाहिले तर सर्वांच्या हालचाली जेथल्या तेथे दिसतात. दोन दरवाजे घराला आहेत. घटनास्थळाचे पुन्हा क्रॉस व्हेरिफिकेशन केले आहे. एक

तपासणी अजून बाकी आहे की, सदर फॅन ७१ किलो वजन पेलू शकतो काय ? नॅशनल फॉरेन्सिक लॅबोरिटी, तळेगांव येथे आहे त्यांची एक्सपर्ट टीम स्पॉटवर येऊन ते खात्री करणार आहेत. इनक्वेस्ट पंचनामा इनकॅमेरा करण्यात आला आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस विदित केले.

समितीने यावर, महिला व बालविकास विभाग किंवा गृह विभाग यांच्याकडून या घटनेच्या निमित्ताने काही सूचना व उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे त्या समितीला त्यांनी दहा दिवसात दिल्या तर अहवालात त्याचा समावेश करता येईल.

समितीकडे वेगवेगळी माहिती आलेली आहे. यामध्ये आणखी काही सुधारणा करता येतील काय ? कारण महिला आयोग, गृह विभाग, महिला व बालविकास विभाग या सर्व विभागांची एकच माहिती समितीकडे येणे अपेक्षित आहे. समितीला वस्तूनिष्ठ माहिती दिली पाहिजे. ग्रामीण भागात बऱ्याच काही बाबी निदर्शनास येतात. परंतु हे प्रकरण मोठे असल्यामुळे आजच्या बैठकीमध्ये हा विषय घेऊन संबंधित विभागाला बोलावले आहे. सदर बैठकीचा उद्देश फक्त चर्चा करणे हा नाही. त्यामध्ये काही त्रुटी राहिल्या असतील तर विभागाकडून आणि महिला आयोगाकडून आणखी काय सुधारणा करता येतील किंवा काही ठिकाणी उशीर झाला असेल तर ते काम लवकर कसे करता येईल, याचा विचार केला पाहिजे. महिला व मुलांवरील अत्याचाराच्या घटना जलदगती न्यायालयासमोर नेल्या पाहिजे. श्रीमती वैष्णवी हगवणे यांना न्याय कसा देता येईल यासाठी सर्वांना मिळून काम करायचे आहे. समितीची शिफारस अहवालामार्फत शासनापर्यंत पोहोचविण्यात येईल. भरोसा सेलचे काम अजून सक्षमपणे कसे करता येईल याचाही विचार केला पाहिजे. शहरी भागात भरोसा सेल आहे, परंतु ग्रामीण भागात अशा बाबी नाहीत. ग्रामीण भागात महिला एखादे प्रकरण घेऊन गेल्यानंतर तिच्याकडे खूप दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे महिलांच्या केसमध्ये प्राधान्यक्रम कसा आणता येईल याकडे लक्ष दिले पाहिजे. श्रीमती मयुरी हगवणे प्रकरणाच्या बाबतीत महिला आयोगाकडे ई-मेल द्वारे तक्रार केली परंतु ६ महिन्याचा कालावधी जाऊन पुढची घटना घडली. तसे भविष्यात घडू नये. ज्या ज्या ठिकाणी महिला तक्रार घेऊन जातील त्यांच्याकडे गंभीरपणे लक्ष द्यावे. त्यादृष्टीने आणखी काय करता येतील यासाठी काही सूचना असतील तर समितीला सांगण्यात यावे. त्यानंतर समिती शासनाकडे त्याचा पाठपुरावा करेल.

यानंतर समितीने, नियमित सुनावण्या घेण्याबाबत प्रश्न केला असता विभागाने नियमित सुनावणी घेण्यासाठी सांगण्यास काही हरकत नाही. परंतु त्यासाठी कायद्यामध्ये बदल करावा लागेल आणि हा कायदा केंद्र शासनाच्या अंतर्गत येतो. याबाबत समितीची शिफारस असेल तर विभाग प्रस्ताव पाठवू शकतो. जलदगती न्यायालयाचा विषय माननीय समिती प्रमुखांनी सांगितला आहे याबाबत विधि व न्याय विभागामार्फत कार्यवाही करावी लागेल, असे समितीच्या निदर्शनास आणून दिले.

महिला आयोगाबाबत समितीने जे दोन ते तीन प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्याबाबत विभागीय प्रतिनिधींनी विदित केले की, सद्यःस्थितीत महिला आयोगाचा ३५ पदांचा आकृतिबंध आहे. तेवढी पूर्ण पदे आता भरण्यात आलेली आहेत. नवीन आकृतिबंधचा प्रस्ताव सुद्धा सामान्य प्रशासन विभागाला पाठवलेला आहे. ४५ पदांचा आकृतिबंध दिलेला आहे. हा आकृतिबंध मान्य झाल्यानंतर कर्मचारीवृंद सुद्धा वाढणार आहे. दुसरा विषय

निधीचा आहे. याबाबत मागणी करावी लागेल. १० ते १५ लाख रुपयांचा निधी वाढवून देण्याचा काही मोठा विषय नाही. इतरही समितीने महिला आयोगाबद्दल प्रश्न विचारले आहेत, त्याबद्दल यापूर्वी चर्चा झालेली आहे. महिला आयोगाच्या कार्यालयासाठी नरिमन पॉइंट येथील जागा भाड्याने देण्यात यावी, असा प्रस्ताव राज्य शासनाला पाठवलेला आहे. प्रस्ताव मान्य होईपर्यंत जवळपास भाड्याने एक कार्यालय घ्यावे लागेल.

महिला आयोगाचा हेल्पलाईन क्रमांक २४ तास उपलब्ध करून देण्याबाबत समितीने प्रश्न उपस्थित केला असता, यासाठी महिला आयोगामार्फत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल असे समितीस विदित केले.

-------

११

## अभिप्राय व शिफारशी

### अभिप्राय

महाराष्ट्र विधानमंडळातील महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती ही एक महत्त्वाची संसदीय समिती असून या समितीच्या माध्यमातून महिलांना समाजात समानता, दर्जा व प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविणे तसेच महिलांच्या कल्याणासाठी शासकीय पातळीवर अंगिकृत केलेल्या धोरणांची व त्यांचा शैक्षणिक व सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी आखण्यात आलेल्या विविध योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात उपाययोजना सुचविणे हे या समितीचे प्रमुख कार्य आहे. इतकेच नव्हेतर राज्य शासनाच्या सेवांमध्ये महिलांना योग्य प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविणे तसेच राज्य महिला आयोगाने सादर केलेल्या अहवालावर विचार करून उपाययोजना सुचविणे. समितीचे कार्य केवळ महिलांपुरते मर्यादित न ठेवता बालकांच्या कल्याणार्थ योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात उपाययोजना सुचविणे, बालकांचे आरोग्य, शिक्षण, संरक्षण व मूलभूत हक्क इ. करिता केंद्र शासनाचा बाल न्याय अधिनियम, २०१५ तसेच केंद्र शासनाच्या बालकांचे लैंगिक शोषणापासून प्रतिबंध कायदा (POCSO), २०१२ व तद्अनुषंगिक विहित नियमानुसार राज्य शासनाच्या कक्षेत येणाऱ्या बाबींसंदर्भात उपाययोजना सुचविणे तसेच बालकांच्या विकासासाठी शासकीय पातळीवर अंगिकृत केलेल्या बाल न्याय अधिनियम, २०१५ च्या अनुषंगाने बाल धोरणांची अंमलबजावणी संदर्भात उपाययोजना सुचविणे इ. महत्त्वाची कामे या समितीकडे सुपूर्द करण्यात आली आहेत. समितीची उपरोक्त कार्यकक्षा पाहता महिला व बालकांचे प्रश्न सोडविण्यासंदर्भात ही समिती एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे.

स्त्रियांना सामाजिक समानता, समान न्याय, समान दर्जा व प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याची आवश्यकता लक्षात घेऊन स्त्रियांमध्ये शैक्षणिक, वैयक्तीक, सामाजिक जागरुकता निर्माण करून त्या आधारे प्रामुख्याने महिलांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने तसेच याअनुषंगाने शासनाने अंगिकारलेल्या धोरणांची प्रभावी व काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने ही समिती नेहमीच प्रयत्नशील असते. जीवनाच्या अनेक क्षेत्रात स्त्रियांना देण्यात येणारा असमान दर्जा व अन्यायाची वागणूक, त्याचप्रमाणे संविधानातील तसेच स्त्रीयांचे कल्याण व संरक्षण यासंबंधीच्या कायद्याच्या तरतुदींचा केला जाणारा भंग या सर्व बाबींवर जागरुकतेने देखरेख ठेवून स्त्रियांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्यासाठी राज्य शासनाच्या स्तरावर देखील अनेक यंत्रणा निर्माण करण्यात आल्या आहेत. राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाची निर्मिती व राज्य महिला आयोगाची स्थापना हा देखील याच यंत्रणेचा एक अविभाज्य भाग आहे.

सन २०२४-२५ करिता गठित महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीमध्ये उपरोक्त उद्दिष्टांची परिपूर्ती होणे संदर्भातील आढावा घेण्याच्या अनुषंगाने झालेल्या बैठकीत अनेक महत्त्वाच्या विषयावर समितीने चर्चा केली. विशेषतः महिलांवरील अत्याचार तसेच वाढत्या हुंडाबळीची प्रकरणे प्राथमिक प्राधान्याने चर्चेला घेण्याबाबत समितीने एकमताने ठरविले. त्यातच नुकतेच "पुणे येथील वैष्णवी हगवणे हुंडाबळीचे गंभीर व ज्वलंत प्रकरण" याची तीव्रता व पार्श्वभूमी हा या निर्णयाचा मुख्य आधार होती.

याअनुषंगाने समितीने साक्षीच्या प्रथम बैठकीत "पुणे येथील वैष्णवी हगवणे मृत्यू" या ज्वलंत प्रकरणाची विस्तृत साक्ष घेण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी समितीसमोर गृह विभाग तसेच महिला व बाल विकास विभागाचे वरिष्ठ अधिकारी, राज्य महिला आयोगाचे सदस्य सचिव तसेच या प्रकरणाशी निगडीत पुणे येथील पोलीस विभागाचे सर्व संबंधित अधिकाऱ्यांना पाचारण करण्यात आले. सदरहू बैठकीसाठी समितीने प्रथम दोन्ही विभागांना या प्रकरणाचा संपूर्ण वस्तुस्थितीदर्शक अहवाल मिळण्याच्यादृष्टीने प्रश्नावली पाठवून लेखी स्वरुपात माहिती घेतली. (माहिती सोबत जोडण्यात आली आहे)

**"वैष्णवी हगवणे मृत्यू"** प्रकरणावर चर्चा करताना त्या माध्यमातून गृह विभाग, महिला व बाल विकास विभाग तसेच राज्य महिला आयोग यांचे स्तरावर महिलांशी संबंधित प्रकरणे हाताळताना करावयाची उपाययोजना, सुधारणा, बदल, कायद्यातील विहित तरतुदींच्या अंमलबजावणीचा आढावा, यासाठी असलेल्या शासकीय यंत्रणा व व्यवस्थेमधील त्रुटींचे निराकरण करून महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी या यंत्रणांचे अधिक सक्षमीकरण करण्याबाबत देखील समितीसमोर विस्तृत चर्चा झाली. (बैठकीचे कार्यवृत्त सोबत जोडण्यात आले आहे)

**"पुणे येथील वैष्णवी हगवणे मृत्यू"** या गंभीर प्रकरणाच्या अनुषंगाने सुरू असलेल्या तपासाचे निष्कर्ष, यातील आरोपींना शिक्षा व पीडीतेच्या कुटुंबियांना न्याय मिळण्यासह राज्यातील एकूणच शासकीय यंत्रणा व व्यवस्थांच्या अंमलबजावणीतील त्रुटी व त्याचे निराकरण करून या व्यवस्था अधिक सक्षम करण्याबाबत समितीने विस्तृत चर्चा करून पुढील शिफारशी करण्यात येत आहेत.

**शिफारशी**

**(१) पुणे येथील वैष्णवी हगवणे हुंडाबळी व मृत्यू प्रकरणी समितीने विस्तृत माहिती घेतली. समितीने चर्चेदरम्यान तपासातील अनेक उणिवा व त्रुटी विभागाच्या निदर्शनास आणून दिल्या. महिलांवरील अत्याचार हा विषय केवळ या प्रकरणा पुरता मर्यादित नसून राज्यात विविध भागात अशाप्रकारच्या अनेक घटना वारंवार घडत आहेत. या घटनेच्या माध्यमातून पीडीत मृत महिलेला न्याय मिळणे तसेच भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्याच्या अनुषंगाने आता उपाययोजना करणे समितीला अगत्याचे व आवश्यक वाटते. या प्रकरणी मृत महिलेचे पती, सासु, सासरे, दिर, नणंद यांचेसह या प्रकरणात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभागी असलेल्या एकूण ११ आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल असून सद्य:स्थितीत त्यांना अटक करण्यात आलेली आहे. या प्रकरणी इन कॅमेरा इन्क्वेस्ट पंचनामा तसेच इन कॅमेरा पोस्टमार्टम झालेले असून त्याचा अहवाल देखील शासनास प्राप्त झालेला आहे. वैष्णवी हगवणे यांची सकृतदर्शनी आत्महत्या दिसत असली तरी हे पुर्णतः कौटुंबिक हिंसाचार, अत्याचार व हुंडाबळीचे प्रकरण असून त्या दिशेनेच या विषयाचा तपास होणे आवश्यक आहे. या प्रकरणी मृत महिलेस पती व कुटुंबियांकडून अमानुष मारहाण, छळ, जाच होत असल्याचे तसेच हुंड्याच्या माध्यमातून ब्रँडेड गाडी, चांदीची भांडी, सोने, रोख रक्कम अशा विविध वस्तु व रकमा घेतल्याचे सबळ पुरावे तपासाअंती विभागाकडे प्राप्त झाले**

आहेत. यासंदर्भातील वैद्यकीय तपासणी अहवाल, पोस्ट मॉर्टम रिपोर्ट, पंचनामे, साक्षीदार, सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल संभाषण (CDR), व्हॉटस ॲप चॅटींग डिटेल्स, ऑडीओ क्लिप, रकमा प्रदान झाल्याचे पुरावे, बँक डिटेल्स, रोखीने तसेच बँकांद्वारे रक्कम हस्तांतरणाचे व्यवहार असे विविध पुरावे व अन्य कागदपत्रे या तपासातून पोलिसांना प्राप्त झाले आहेत. याआधारे या प्रकरणाचा सखोल तपास करण्यात यावा. यासाठी सायबर व फॉरेन्सिक तज्ज्ञांची देखील मदत घेऊन या प्रकरणाचा तपास तातडीने पुर्ण करून यासंदर्भातील सखोल पुराव्यांसह चार्जशीट दाखल करण्याबाबतची कारवाई विभागाने करावी व कोणत्याही परिस्थितीत यातील आरोपी पुराव्याअभावी सुटणार नाहीत याची दक्षता विभागाने घ्यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस तात्काळ देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(२) सदरहू प्रकरणी हगवणे कुटुंबियांचे निकटवर्तीय असलेले पुण्यातील तत्कालीन आय.जी., श्री.जालींदर सुपेकर यांचा सहभाग व हस्तक्षेप देखील तपासादरम्यान समोर आला आहे. इतकेच नव्हेतर वैष्णवी हगवणेच्या लग्नात रुखवताच्या नावाखाली श्री.सुपेकर यांच्या पत्नीच्या बँक खात्यात एक लाख रुपये तसेच रोखीने पन्नास हजार असे एकूण दीड लाख रुपये ट्रान्सफर केल्याचे पुरावे देखील विभागाकडे प्राप्त झालेले आहेत. तसेच कस्पटे कुटुंबियांनी देखील ही बाब पोलीस जबाबात नोंदविलेली असून प्रसार माध्यमांसमोर देखील सांगितलेली आहे. इतकेच नव्हेतर कस्पटे (वैष्णवीचे आई-वडील) कुटुंबियांनी या प्रकरणात आय.जी. श्री.सुपेकर यांनी पदाचा गैरवापर करून त्या माध्यमातून सदर प्रकरणी दबाव आणून आरोपिंना मदत करण्यात येत असल्याचे स्टेटमेंट पोलिसांना दिलेले आहे. हगवणे कुटुंबातील निकटवर्तीय पोलीस विभागात वरिष्ठ पदांवर कार्यरत असल्यामुळे या प्रकरणाच्या तपासावर त्यांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष परिणाम होण्याची पूर्ण शक्यता लक्षात घेता या प्रकरणाच्या तपासापासून अशा सर्व व्यक्तींना दूर ठेवण्यात यावे. तसेच त्यांच्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रभाव, दबाव व हस्तक्षेप या तपासावर होणार नाही याची पुर्ण दक्षता विभागाने घ्यावी. श्री.सुपेकर हे पदाचा गैरवापर करून या प्रकरणी दबाव आणण्याची पुर्ण शक्यता आहे. त्याआधारे त्यांचा या प्रकरणातील सहभागाबाबत सखोल तपास करण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे त्यादरम्यान श्री.जालिंदर सुपेकर यांची एक ऑडीओ क्लीप माध्यमांद्वारे प्रसारित करण्यात आली. या ऑडीओ क्लीपची फॉरेन्सीक विभागाकडून सखोल तपासणी करून याची सत्यता पडताळून पहावी. यात वस्तुस्थिती आढळल्यास श्री.जालिंदर सुपेकर यांना निलंबित करून त्यांचेवर गुन्हा दाखल करून त्यांना या प्रकरणी सहआरोपी करण्यात यावे. तसेच श्री.जालिंदर सुपेकर यांच्या पत्नीच्या खात्यात रुखवताच्या निमित्ताने हुंड्याचे पैसे हस्तांतरित झाल्याचे दिसून येत असल्यामुळे त्यादृष्टीने तपास करून श्री.जालिंदर सुपेकर यांच्या पत्नीला या प्रकरणात सहआरोपी करण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस तात्काळ देण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.

(३) सदरहू प्रकरणात सुपेकर कुटुंबियांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभाग असण्याची व कस्पटे कुटुंबियांनी त्याबाबत आरोप करुनही पोलीसांनी या दिशेने स्वतःहून तपास करून कारवाई करणे आवश्यक व अभिप्रेत असताना त्यासंदर्भात कोणतीही कारवाई पोलीस विभागाच्या स्तरावरुन अद्यापही झालेली नाही, ही बाब अत्यंत गंभीर, खेदजनक व आक्षेपार्ह असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. इतकेच नव्हेतर अशाप्रकारची कारवाई करून समितीला तात्काळ माहिती देण्यात यावी असे निदेश समितीने विभागाला देऊनही सदरहू अहवाल सभागृहाला सादर होईपर्यंत अशी कोणतीही माहिती समितीला प्राप्त झाली नाही. समितीच्या बैठकीला DG, ADG, Commissioner वरिष्ठ दर्जाचे अधिकारी उपस्थित असून देखील अशाप्रकारे कारवाईबाबतची आश्वासित माहिती समितीने मागणी करुनही समितीस सादर न होणे ही अत्यंत गंभीर व समितीचा अवमान करणारी बाब आहे. याची विभागाने गंभीर दखल घेवून यातील दोषींवर तात्काळ कारवाई करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तात्काळ देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(४) या प्रकरणी उघडकीस आलेली दुसरी गंभीर घटना म्हणजे श्रीमती मयूरी हगवणे (हगवणे कुटुंबियांची थोरली सून) हिच्यासोबत देखील सासरच्या लोकांकडून हुंड्यासाठी मारहाण, शारीरिक व मानसिक छळ, मारुन टाकण्याची धमकी तसेच विनयभंग झाल्याची गंभीर बाब समोर आली आहे. तिच्याद्वारे यासंदर्भातील अनेक तक्रारी या अगोदर विविध ठिकाणी केल्याचेही निदर्शनास आले आहे. या प्रकरणी देखील संबंधित पोलीस स्टेशनमध्ये झालेल्या क्रॉस तक्रारी, दाखल झालेले एफ.आय.आर., या तक्रारींची भरोसा सेल, संबंधित पोलीस स्टेशन, राज्य महिला आयोगाकडून घेण्यात आलेली दखल यासंदर्भात देखील अनेक गंभीर मुद्दे समोर आले आहेत. यावरुन हगवणे कुटुंबातील दोन्ही सुनांना कौटुंबिक हिंसाचार, हुंड्यासाठी छळाला सामोरे जावे लागल्याचे स्पष्टपणे दिसून येते. मयूरी हगवणे प्रकरणाची वेळेत गंभीर दखल घेवून कार्यवाही झाली असती तर कदाचित वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरण टाळता आले असते.

मयूरी हगवणे यांनी तक्रार करणेसाठी वेळोवेळी संबंधित पोलीस यंत्रणेकडे प्रत्यक्षात संपर्क साधला असता पोलीस अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची कारवाई फक्त मध्यस्थी करणे, समज देणे व समुपदेशना पुरती मर्यादित ठेवली. आय.जी. श्री.सुपेकर यांचा देखील या प्रकरणी दबाव असल्याची शक्यता नाकारता येत नाही, ज्यामुळे त्याचा परिणाम या प्रकरणाच्या तपासावर झाला. संबंधित पोलीसांनी कोणत्या नियमानुसार व अधिकारात या प्रकरणी मध्यस्थी करण्याची कारवाई केली. पीडित महिला पोलीस स्टेशनवर आल्यानंतर केवळ गुन्हा नोंदविणे ही पोलीसांची जबाबदारी असताना अशापध्दतीने अधिकारबाह्य कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर देखील सक्त कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस तात्काळ देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(५) कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रकरणांमध्ये मृत महिलेच्या लहान मुलांची खुप आबाळ होते. मुलांच्या कस्टडी तसेच त्यांच्या संगोपनावरुन खुप अडचणी निर्माण होतात. वैष्णवी हगवणे प्रकरणात देखील तिच्या बाळाची कस्टडी तिच्या आई-वडीलांकडे केवळ ४ महिन्यांसाठी देण्यात आली आहे. त्यानंतर त्या मुलाच्या कस्टडीबाबतचा प्रश्न निर्माण होईल. वैष्णवीच्या बाळाचा ताबा तिच्या आई-वडीलांकडेच ठेवण्याबाबत तातडीने शासनस्तरावर कार्यवाही व्हावी. तसेच मुलांच्या ताब्याबाबत महिला व बालविकास विभाग तसेच बाल हक्क आयोग यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत मुलांच्या बाजुने आधारभुत अशी SOP तयार करून न्यायालयात दाखल करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तात्काळ देण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.

(६) कौटुंबिक हिंसाचार व अत्याचार प्रकरणात विभागाकडून प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेवून कारवाई होणे अभिप्रेत असताना सर्व प्रकरणांमध्ये सरसकट समज, मध्यस्थी व समुपदेशनाचे धोरण स्वीकारण्याकडेच पोलीसांचा जास्त कल दिसून येतो. पोलीस अधिकाऱ्यांकडून कौटुंबिक अत्याचारांची प्रकरणे हाताळताना त्याचा तपास व कारवाई अन्य गुन्ह्यांप्रमाणे तांत्रिकरित्या हाताळणे काहीअंशी शक्य व योग्य नसते याच्याशी समिती सहमत आहे. तपासाच्या प्राथमिक स्तरावरच पोलीस अधिकाऱ्यांकडून टोकाची व कडक कायदेशीर भूमिका घेतल्यास कुटुंबव्यवस्था विस्कळीत व उध्वस्त होण्याची शक्यता असून कुटुंब पुन्हा एकत्र येण्याची शक्यता कमी राहते. भावनिक व संवेदनशील भूमिकेतून पाहता काहीअंशी ही बाब रास्त देखील असू शकते. काहीअंशी त्या माध्यमातून अशाप्रकारची प्रकरणे प्राथमिक स्तरावर थोपविली जातात. परंतु त्यानंतर मात्र अशा प्रकरणांना गंभीर स्वरुप प्राप्त होते. महिला तक्रार करायला आल्यावर अमानुषपणे मारहाण केल्याचे सकृतदर्शनी पुरावे असताना पोलीसांची कारवाई समुपदेशनापुरती मर्यादीत ठेवणे सर्वच प्रकरणांमध्ये फलद्रूप ठरत नाही. कौटुंबिक हिंसाचाराची प्रकरणे त्यांच्या स्तरावरच मिटविण्याचा पोलीसांचा कल असतो, काहीअंशी ते योग्यही असू शकते. परंतु त्यातून एकाही प्रकरणाचे स्वरुप जर वैष्णवी हगवणे प्रकरणासारखे झाल्यास त्याचे गंभीर परिणाम महिलेला भोगावे लागतात. त्यामुळे पोलीसांनी देखील प्रत्येक प्रकरण त्याची पार्श्वभूमी व गांभीर्य लक्षात घेता स्वतंत्ररित्या तपासण्याची नितांत आवश्यकता आहे. मुळात समुपदेशन हे पोलीसांचे काम नसून प्रकरण समुपदेशनाच्या स्तरावरचे आहे किंवा नाही हे प्राथमिकदृष्ट्या तपासणे आवश्यक आहे. यासंदर्भात विभागाने प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार व गांभीर्य लक्षात घेऊनच कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.

(७) वैष्णवी हगवणे प्रकरणाची राज्य महिला आयोगाने स्वतःहून (su-moto) दखल घेतली. परंतु तोपर्यंत गृह विभागाकडे या प्रकरणी कारवाई अगोदरच सुरु झाली होती. महाराष्ट्र राज्य महिला आयोग हे स्वतंत्र व स्वायत्त आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे एखादी तक्रार दाखल झाल्यानंतर ती संबंधित एजन्सीकडे पुढील कारवाईसाठी पाठविली जाते.

त्यानंतर सदर प्रकरणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर चौकशीअंती ते प्रकरण बंद करण्यात येते. मयुरी हगवणे प्रकरणी देखील राज्य महिला आयोगाकडे तक्रार करण्यात आली होती व सदर तक्रार पोलीस स्टेशनला कारवाईसाठी पाठविण्यात आली होती. यावरुन आयोगामार्फत केवळ तक्रार पुढील कारवाईकरिता संबंधित पोलीस स्टेशनकडे पाठविण्या पुरते मर्यादित स्वरुपात महिला आयोगाची भूमिका नसते. आयोगासारखी स्वायत्त व स्वतंत्र यंत्रणा इतक्या मर्यादित कार्यकक्षेत काम करणे कायद्याला अभिप्रेत नाही. राज्य महिला आयोगाकडे एखादे कौटुंबिक हिंसाचाराचे प्रकरण दाखल झाल्यास त्यांच्यामार्फत ते पोलीस स्टेशनला पाठविले जाते. इतक्या पुरतेच आयोगाची जबाबदारी मर्यादित न ठेवता त्यांना अधिक जबाबदारी व अधिकार देऊन त्याचे सक्षमीकरण करणे आवश्यक आहे. आयोगाला फक्त शिफारस करण्याचे अधिकार असून त्यांना कोणतेही न्यायिक वा तपासाचे अधिकार नाहीत. तसेच अशाप्रकारची कोणतीही यंत्रणा त्यांच्याकडे उपलब्ध नाही. महिला आयोगाच्या माध्यमातून पिडीतांना मदत व दिलासा मिळण्याच्या दृष्टीने कोणतेही अधिकार आयोगाला देण्यात आलेले नाहीत. राज्य महिला आयोगाच्या अधिकारांमध्ये बदल वा सुधारणा करणेबाबतची कार्यवाही शासनाद्वारे करण्यात यावी. प्रसंगी राज्य महिला आयोगाला न्यायालयीन अधिकार देण्याचा विचार करण्यात यावा. तसेच आयोगामार्फत एखाद्या प्रकरणासाठी तपास अधिकारी नेमला तर त्याने किती दिवसात त्याचा अहवाल देणे बंधनकारक आहे यासंदर्भात कोणतीही कालमर्यादा नाही. तपास अधिकाऱ्यासाठी ही कालमर्यादा विहित करणे अत्यंत आवश्यक आहे अशी समितीची शिफारस आहे.

(८) राज्य महिला आयोगावर सदस्य सचिव म्हणून भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांची (IAS) नियुक्ती केली जाते. परंतु त्यांची आयोगावरील नियुक्ती ही अल्पावधीसाठी राहते. ५ ते ६ महिन्यानंतर त्यांची बदली होते. अशाप्रकारे वर्षाला ३ आय.ए.एस. अधिकाऱ्यांची तेथे सदस्य सचिव म्हणून नियुक्ती होते. इतकेच नव्हेतर त्या अधिकाऱ्यांकडे आयोगाच्या सदस्य सचिव या व्यतिरिक्त बाल हक्क आयोग तसेच महिला आर्थिक विकास महामंडळाचे देखील अतिरिक्त कामकाज सोपविण्यात येते. या तीनही ठिकाणची कामे करताना त्या अधिकाऱ्यांना पुर्णवेळ आयोगाचे काम पाहणे शक्य होत नाही. त्यामुळे देखील आयोगाच्या कामावर त्याचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष परिणाम होत असतो. राज्य महिला आयोगाला सदस्य सचिव म्हणून देण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांना किमान ३ वर्षे तेथे कार्यरत ठेवावे व त्यांचेकडे दुसरे कोणतेही अतिरिक्त कामकाज देवू नये, जेणेकरुन त्यांना पुर्ण लक्ष आयोगाचे कामकाज बघण्याकडे देता येईल व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तात्काळ देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(९) राज्य महिला आयोगाला कार्यालयासाठी योग्य ठिकाणी व पुरेशी जागा देखील उपलब्ध नाही. इतकेच नव्हेतर पुरेसा कर्मचारी वर्ग देखील त्यांना उपलब्ध नाही. निधीची देखील कमतरता आहे. त्यातही अनेक पदे रिक्त ठेवल्यामुळे निश्चितच आयोगाच्या कामावर त्याचा विपरीत परिणाम होतो. सद्य:स्थितीत महिला आयोगाचा ३५ पदांचा आकृतीबंध असून तो सन १९९५ पासूनचा

आहे. त्यावेळी असलेल्या गुन्ह्यांच्या संख्येच्या तुलनेत आजमितीस वाढीव गुन्ह्यांची संख्या पाहता ही पदसंख्या वाढविण्याची नितांत आवश्यकता असून ती पुर्णपणे भरणे देखील आवश्यक आहे. आता एकुण ४५ पदांचा आकृतीबंधाचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे प्रस्तावित आहे. तो तात्काळ मंजूर करण्यात यावा व ही रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावीत. तसेच समुपदेशन अधिकाऱ्यांची संख्या देखील कमी असून ती देखील वाढविणे आवश्यक आहे. तसेच आयोगावर सर्व सदस्यांची नियुक्ती देखील तातडीने करण्यात यावी. रिजनल लेव्हलवर आयोगाच्या सदस्यांना चार्ज देण्यात यावा. आयोगातील निम्मे कर्मचारी कंत्राटी पध्दतीने तर काही प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत. तेथे पुरेसे मनुष्यबळ देण्यात यावे. समुपदेशन अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात यावे. जेंडर सेंसेटायझेशनबाबत एनजीओ वा अन्य सामाजिक संघटनांची मदत घेवून एक पॅनल सिस्टीम निर्माण करण्यात यावी. तसेच त्यांना निधी देखील वाढवून देण्यात यावा. त्याचप्रमाणे आयोगाला स्वतंत्र कार्यालय उपलब्ध करून देण्यात यावे. तोपर्यंत जवळपास एखादे कार्यालय भाडेतत्त्वावर देणे शक्य असल्यास ते देण्यात यावे व यांसदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तात्काळ देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(१०) बालहक्क आयोगात अध्यक्ष व सदस्यांची पदे बऱ्याच कालावधीपासून रिक्त आहेत. ती तात्काळ भरण्यात यावीत व त्याचे देखील अधिक सक्षमीकरण करण्यात यावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तात्काळ देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(११) या प्रकरणाच्या निमित्ताने भरोसा सेल तसेच महिला दक्षता समितीचे उत्तरदायित्व व सक्षमीकरण याचा देखील आढावा घेणे आवश्यक आहे. भरोसा सेलमध्ये कोणत्या रँकच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाते व त्यांना अशाप्रकारची प्रकरणे हाताळण्याचा असलेला देखील अनुभव विचारात घेणे आवश्यक आहे. त्यांच्याकडील प्रलंबित प्रकरणांचा तसेच यशस्वीरित्या निकाली काढण्यात आलेल्या प्रकरणांचा देखील आढावा घेणे आवश्यक आहे. प्रत्येक युनिटमध्ये एक भरोसा सेल असतो व ते थेट क्राईम ब्रॅन्चच्या नियंत्रणाखाली काम करीत असून तेथे मोठ्या विभागीय पातळीवर इन्सपेक्टर रँकचे अधिकारी देण्यात येतात. शहरी भागात ही व्यवस्था सेंट्रलाईज असून ती सी.पी.ऑफीसमध्ये कार्यरत असते. भरोसा सेलकडे चांगल्या प्रकारचे समुपदेशक देखील उपलब्ध नसतात. भरोसा सेलचे सदस्य वा अधिकारी हे स्वतःच समुपदेशनाचे काम करीत असल्याचे अनेक ठिकाणी दिसून येते. ही देखील अत्यंत गंभीर बाब आहे. महिला अत्याचारांची प्रकरणे अशाप्रकारे हाताळणे निश्चितच अभिप्रेत नाही. याअनुषंगाने भरोसा सेलमध्ये प्रलंबित प्रकरणांची संख्या तसेच किती प्रकरणांमध्ये समुपदेशनाच्या माध्यमातून कुटुंब एकत्र आणण्यात आली, किती प्रकरणांमध्ये समुपदेशनाचा उपयोग न झाल्यामुळे एफ.आय.आर. रजिस्टर झाले, किती प्रकरणे निकाली काढण्यात आली याचा देखील आढावा घेणे आवश्यक आहे. अशापध्दतीचा आढावा घेण्याची शासनस्तरावर व्यवस्था निर्माण करण्यात यावी. तसेच सर्वसामान्य लोकांना भरोसा सेलबाबत पुर्ण माहिती नसते. या सेलच्या माध्यमातून देखील प्रकरणे

कशाप्रकारे हाताळली जाऊ शकतात याअनुषंगाने मोठ्या प्रमाणात जनजागृती करणे आवश्यक आहे. कौटुंबिक हिंसाचार कायद्या अंतर्गत पोलीसांनी कशाप्रकारची कार्यपध्दती अवलंबिली पाहिजे याबाबत नियमावली विहित होणे आवश्यक आहे. शासनस्तरावरुन यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कर्यावाहीची माहिती समितीस तात्काळ देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(१२) महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कौटुंबिक हिंसाचार कायदा जास्तीत जास्त कसा सक्षम व मजबूत करता येईल याबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. कित्येक महिला अत्याचार सहन करीत राहतात, परंतु कुठल्याही शासकीय व्यवस्थेकडे अनेक समाज बंधनांमुळे मदतीसाठी येण्यासाठी घाबरतात. खुपच कमी प्रकरणांमध्ये अत्याचार असह्य झाल्यास धाडस एकत्रित करून काही महिला या शासकीय व्यवस्थांकडे येत असतात. परंतु तेथे मात्र अशा प्रकरणांचा निपटारा योग्य पध्दतीने न झाल्यास त्या महिलेला त्यापेक्षा जास्त अत्याचाराला सामोरे जावे लागते. त्याअनुषंगाने देखील सर्व बाबींचा विचार करून हे कायदे अधिक सक्षम व प्रभावी करण्यात यावेत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तात्काळ देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(१३) केवळ केसेस दाखल करणे अशा प्रकरणांमध्ये महत्त्वाचे नसून त्याचा निपटारा गुणवत्तेनुसार व विहित मुदतीत न झाल्यास या संपुर्ण कार्यवाहीला कोणताही अर्थ शिल्लक राहत नाही. महिला अत्याचारांच्या प्रकरणांमध्ये दोषसिध्दीचे प्रमाण हे केवळ ५ ते १० टक्के आहे. याचा देखील गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. याकरिता अनेक बाबी कारणीभूत आहेत. त्यातील महत्त्वाचे व विचार करण्यायोग्य कारण म्हणजे घटना घडल्या नंतर ही प्रकरणे तातडीने सुनावणीसाठी न येता वर्षानुवर्षे प्रलंबित राहिल्यामुळे इतक्या प्रदीर्घ कालावधीनंतर पीडीत महिला अशा केसेसचा पाठपुरावा करण्याच्या मन:स्थितीत राहत नाहीत. घटना घडल्यानंतर लगेचच या विषयाचे दोषारोप दाखल करणे, पुरावे गोळा करणे, सुनावणी घेणे व निकाल देणे ही प्रक्रिया सलग केली तर अशी प्रकरणे निकाली निघण्याचे प्रमाण वाढू शकते. घटना घडल्यानंतर ८ ते १० वर्षे ही प्रकरणे सुरु राहिली तर, पुन्हा एकदा पीडीत महिलेचे आयुष्य उध्द्वस्त होवू शकते किंवा कोणत्या ना कोणत्या स्वरुपात या महिला आयुष्यात स्थिरावलेल्या असतात, कुठेतरी नोकरी करत असतात, जॉब सिक्युरीटीमुळे महिला तक्रार नोंदविण्यासाठी समोर येत नाही. कारण त्यामुळे त्यांची नोकरी जाण्याची भिती असते व त्यांचा उदरनिर्वाह करणे क्रमप्राप्त असते, काहींचे विवाह झालेले असतात, कुटुंब असते अशा परिस्थितीत भुतकाळातील अशा प्रकरणांचा पाठपुरावा करणे सामाजिकदृष्ट्या महिलांना शक्य होत नाही. त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण होऊ शकतात. अशा परिस्थितीत अशी प्रकरणे जलदगती पध्दतीने तसेच सलग सुनावणी घेऊन निकाली काढल्यास हा दोषारोप सिध्द होण्याचे प्रमाण निश्‍चितच वाढू शकते. महिला अत्याचारांवरील गुन्ह्यांची दररोज सुनावणी घेऊन प्रकरण निकाली काढण्याच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही शासनस्तरावर

करण्यात यावी. त्यासाठी आवश्यकता भासल्यास केंद्रातील कायद्यामध्ये सुधारणा करावयाची असल्यास राज्य शासनामार्फत तशी सुधारणा करण्यात यावी अथवा राज्य शासनाच्या स्तरावर अस्तित्त्वात असलेल्या कायद्यांमध्ये सुधारणा करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तात्काळ देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(१४) सद्य:स्थितीत केवळ जिल्हास्तरावर समुपदेशन केंद्रे अस्तित्त्वात आहेत. ती तालुकास्तरावर करण्यात यावेत, जेणेकरुन यासाठी पीडीत महिलांची गैरसोय होणार नाही. प्रशिक्षित समुपदेशकांची तेथे नियुक्ती करण्यात यावी. अशाप्रकारचे समुपदेशनाच्या वेळी मनोसोपचार तज्ञाची देखील अत्यंत आवश्यकता असते. त्याअनुषंगाने योग्य ती कार्यवाही शासनस्तरावर करण्यात यावी. तसेच महिला आयोगाची हेल्पलाईन सद्य:स्थितीत सुरु आहे, परंतु ती केवळ कार्यालयीन वेळेपुरती मर्यादित असून त्याचा हवा तसा उपयोग महिलांना होणार नाही. हेल्पलाईन ही कायम २४ तास सुरु असणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने ही हेल्पलाईन २४ तास सुरु राहण्याची कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(१५) आयोगाचा पत्रव्यवहार हा केवळ ई-मेलद्वारे मर्यादित न ठेवता राज्यातील कानाकोपऱ्यात तसेच दुर्गम भागातील महिलांना देखील याची मदत घेता येऊ शकली पाहिजे अशी व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता आहे. हा पत्रव्यवहार सद्य:स्थितीत उपलब्ध असलेल्या अनेक आधुनिक मार्गाने कसा करता येईल याची देखील उपाययोजना करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(१६) शासनस्तरावर अस्तिवात व उपलब्ध असलेल्या विविध व्यवस्थांची संपुर्ण माहितीबाबत जनसामान्यांचे जागरुकीकरण करण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावरुन करण्यात यावी. त्याअनुषंगाने बालकांचे, शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे योग्य ते समुपदेशन करण्यात यावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तात्काळ देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(१७) कौटुंबिक हिंसाचाराची प्रकरणे मोठ्या प्रमाणात प्रलंबित असून ही १० ते १५ वर्षे सुरु राहतात. दरम्यानच्या काळात त्या महिलेला कोणत्याही प्रकारचा इंटरीम मेन्टेनन्स देण्यात येत नाही. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या या महिला दुर्बल होतात. त्यामुळे त्या महिलेला ६० दिवसांच्या आत इंटरिम मेन्टेनन्स मिळण्याबाबतची व्यवस्था करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तात्काळ देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(१८) बऱ्याचदा राजकीय व प्रशासकीय यंत्रणा हे महिला अत्याचारांचे विषय अत्यंत संवेदनशीलरित्या हाताळतात. परंतु याची अंमलबजावणी स्थानिक पातळीवर तितक्या प्रभावीपणे होत असल्याचे बऱ्याचदा दिसून येत नाही. ड्युटी ऑफिसरच्या स्तरावर मात्र ही प्रकरणे योग्यरित्या

न हाताळल्यास त्यातून अनेक अडचणी उद्भवतात व त्यामुळे शासनाची देखील प्रतिमा मलिन होते. त्यामुळे ड्युटी ऑफिसरच्या स्तरावरील अधिकाऱ्यांना अशी प्रकरणे हाताळताना विशेष प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. BNS ८० (२) आधीचे IPC चे (कलम ३०४ (ब)) नुसार दाखल झालेली प्रकरणे तसेच हुंडाबळी व महिला अत्याचारांच्या प्रकरणांचा तपास एसीपी दर्जाचे अधिकाऱ्यांकडे देण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तात्काळ देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(१९) महिलांचे अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार अथवा हुंडाबळी प्रकरणात मृत महिलेचे एफ.आय.आर. व पोस्टमार्टमची प्रत तिच्या कुटुंबियांनी मागणी केल्यास तात्काळ उपलब्ध करून देण्यात येत नाही. या प्रती उपलब्ध करण्यास लागलेल्या विलंबामुळे देखील शंकेस वाव राहतो. तसेच त्यात फेरफार होण्याची देखील शक्यता निर्माण होते. त्यामुळे पिडीत वा मृत महिलेच्या कुटुंबियांकडून अशाप्रकारच्या अहवालांची मागणी केल्यास ती तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावीत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तात्काळ देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(२०) राज्य महिला आयोग आपल्या दारी सारखे स्तुत्य उपक्रम राबविण्यात यावे, जिल्हास्तरावर कार्यशाळा घेण्यात याव्यात. त्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींना देखील निमंत्रित करण्यात यावे. प्रत्येक युनिटमध्ये महिन्यातून एकदा संपर्क ठेवून आढावा बैठक आयोजित करून प्रकरणांचा निपटारा कालबध्द पध्दतीने करावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तात्काळ देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

---------

# परिशिष्ट – “अ”

## (विभागाकडून समितीस प्राप्त झालेली माहिती)

**विषय :- महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती यांच्याकडे विभागीय सचिवांच्या साक्षीकरिता महिला आयोगाशी संबंधित मुद्यांची सविस्तर टिपणी (श्रीमती वैष्णवी हगवणे )**

महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम १९९३ अन्वये आयोगाची स्थापना दिनांक २५ जानेवारी १९९३ रोजी करण्यात आली. भारताच्या संविधानाचे अनुच्छेद १४, १५ व १६ अन्वये स्त्रियांचे मूलभूत हक्क मिळवून देण्यास चालना देण्याच्या उद्देशाने आणि स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारण्याकरिता राज्याच्या धोरणाची आणि विशेषतः संविधानाच्या अनुच्छेद ३८, ३९, ३९ अ व ४२ मध्ये अंतर्भूत केलेली निदेशक तत्वे अंमलात आणण्यासाठी, तसेच स्त्रियांची अप्रतिष्ठा करणा-या प्रथांच्या बाबतीत अन्वेषण करुन योग्य त्या सुधारात्मक उपाययोजना करणे किंवा सुचविणे, स्त्रियांवर परिणाम करणा-या कायद्यांचे परिणामकारकरित्या संनियंत्रण व अंमलबजावणी करणे व स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे व उंचावणे या गोष्टींशी संबंधित असलेल्या सर्व बाबींवर शासनाला सल्ला देण्यासाठी आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. **मा. आयोगाच्या कलम १० (२) नुसार न्याय चौकशी करण्याचा दिवाणी न्यायालयाचे** अधिकार आहेत.

उपरोक्त पत्रात नमूद केल्यानुसार आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत चर्चा करण्याकरिता आयोग कार्यालयाशी निगडीत असलेला माहितीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| श्रीमती वैष्णवी हगवणे प्रकरण तपशिल | | |
|---|---|---|
| मुद्दा क्रमांक १ | श्रीमती वैष्णवी हगवणे यांच्या मृत्यू प्रकरणाची संपूर्ण वस्तुनिष्ठ माहिती. | मयत श्रीमती वैष्णवी हगवणे यांना सासरच्या व्यक्तींकडून हुंड्यासाठी मानसिक, शारीरिक छळ **करुन मृत्यूपूर्वी क्रुर वागणूक देऊन त्यांचा जाच करुन** तिला इच्छापूर्वक मारहाण करुन तिचे मृत्यूस कारणीभूत झाले आहेत. |
| मुद्दा क्रमांक २ | प्रकरणाची पार्श्वभूमी | दिनांक १६/५/२०२५ रोजी बावधन, पुणे येथे श्रीमती वैष्णवी शशांक हगवणे वय २४ वर्ष यांनी राहते घरी मृत अवस्थेत आढळली. प्रकरणी मयत श्रीमती वैष्णवी हगवणे यांना सासरच्या व्यक्तींकडून हुंड्यासाठी मानसिक, शारीरिक छळ करुन मृत्यूपूर्वी क्रुर वागणूक देऊन त्यांचा जाच करुन तिला इच्छापूर्वक मारहाण करुन तिचे मृत्यूस कारणीभूत झाले आहेत. अशी तक्रार वैष्णवीचे वडील श्री. आनंद ऊर्फ अनिल कस्पटे यांनी तक्रार केली असता, याबाबत बावधन पोलीस स्टेशन यांनी तपास करुन गु.रजि.नं. २०६/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ८० (२), १०८, ११५(२), ३५२, ३५१(२), ११८(१), ३(५), ६१(२) जे.जे.ॲक्ट कलम २०१५ कलम ७५, ८७, हुंडा प्रतिबंध अधिनियम कलम ४ प्रमाणे (भारतीय दंड विधान संहिता कलम ३०४(ब),३०६,३२३,३२४,५०४,५०६,३४, १२०ब) नुसार |

| | | |
|---|---|---|
| | | गुन्हा दाखल केला असून प्रकरणातील सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे. |
| मुद्दा क्रमांक ३ | श्रीमती हगवणे यांच्या शवविच्छेदन अहवाल (पोस्टमोर्टम) | गृह विभागाशी संबंधित आहे. |
| मुद्दा क्रमांक ४ | प्रकरणाची सद्य:स्थिती | सर्व आरोपींविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले असून सर्व आरोपी अटकेत आहेत. बावधन पोलीस स्टेशन कडून गुन्ह्याचा सखोल तपास करुन अटक आरोपी यांच्याविरुध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र पोलीसांकडून दाखल करण्यात येणार आहे. |
| मुद्दा क्रमांक ५ | यातील दोषींवर आजतागायत केलेल्या कारवाईचा अहवाल | गृह विभागाशी संबंधित आहे. |
| मुद्दा क्रमांक ६ | हगवणे कुटुंबाची मोठी सून श्रीमती मयुरी हगवणे (जगताप) यांनी देखील सासरच्या मंडळीकडून होणा-या छळाबाबत या अगोदर दिलेल्या तक्रारींची माहिती. | वेगळ्याने टिपणी सादर करण्यात आली आहे. |
| मुद्दा क्रमांक ७ | तक्रार कोणाकडे केली होती यांचा तपशिल. | मयत श्रीमती वैष्णवी हगवणे यांच्या आत्महत्या प्रकरणाबाबत प्रसार माध्यमातून प्रसारित होत असलेल्या बातमीची महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालय अधिनियम, १९९३ अंतर्गत कलम १० (१) (फ) नुसार स्वाधिकारे (SUMOTO) दखल घेण्यात आली. |
| मुद्दा क्रमांक ८ | याबाबत पौंड पोलीस स्टेशन तसेच भरोसा सेलकडे तक्रार केली असल्यास त्याबाबतची माहिती. | गृह विभागाशी संबंधित आहे. |
| मुद्दा क्रमांक ९ | राज्य महिला आयोगाकडे केलेल्या तक्रारींचा तपशील | <u>श्रीमती वैष्णवी हगवणे प्रकरण तपशिल</u><br><br>श्रीमती वैष्णवी शशांक हगवणे यांच्या दूर्देवी मृत्यूबाबत प्रसार माध्यमातून प्रसारित होत असलेल्या बातमीची महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३ अंतर्गतं कलम १० (१) (फ) नुसार स्वाधिकारे (SUMOTO) दखल घेण्यात आली.<br><br>सदर प्रकरणी दिनांक १९/५/२०२५ रोजी वरिष्ठ पोलीस स्टेशन, बावधन पोलीस स्टेशन, जिल्हा पुणे यांना चौकशी अहवाल मागविण्याकामी पत्रव्यवहार करण्यात आला. सदर प्रकरणी समाज माध्यमात |

| | | |
|---|---|---|
| | | प्रतिक्रीया उमटत आहेत. त्यामुळे सदर प्रकरणी तात्काळ कारवाई करुन आयोगास अहवाल पाठविणेबाबत पत्र पाठविण्यात आले. प्रकरणाचा संपूर्ण तपास बावधन पोलीस स्टेशन करत आहे. दिनांक २६/५/२०२५ रोजी चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे.<br>बावधन पोलीस स्टेशन यांनी FIR NO. २०६/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ८० (२), १०८, ११५(२), ३५२, ३५१(२), ११८(१), ३(५), ६१(२) जे.जे.ॲक्ट कलम २०१५ कलम ७५, ८७, हुंडा प्रतिबंध अधिनियम कलम ४ प्रमाणे (भारतीय दंड विधान संहिता कलम ३०४(ब),३०६,३२३,३२४,५०४,५०६,३४, १२०ब) नुसार गुन्हा दाखल केला असून प्रकरणातील सर्व आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरु आहे. |
| मुद्दा क्रमांक १० | उपरोक्त सर्व तक्रारी केल्या त्यावेळी त्या-त्या ठिकाणी कार्यरत असलेल्या अधिका-यांचे नाव व पदनामासह तपशिल | **श्री लक्ष्मण मानकर, समुपदेशक नि प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, वांद्रे, मुंबई.** |
| मुद्दा क्रमांक ११ | उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासन स्तरावरुन तसेच त्या-त्या ठिकाणी कार्यरत असलेल्या संबंधित अधिका-यां कडून कोणती दखल घेण्यात आली त्याबाबतचा तपशिल | श्रीमती वैष्णवी हगवणे यांच्या मृत्यूप्रकरणी प्रसार माध्यमातून प्रसारित होत असलेल्या **बातमीची** स्वाधिकारे (SUMOTO) दखल घेऊन **दिनांक** १९/५/२०२५ रोजी वरिष्ठ पोलीस स्टेशन, **बावधन पोलीस स्टेशन, जिल्हा पुणे यांना चौकशी अहवाल मागविण्याकामी** पत्रव्यवहार **करण्यात आला. सदर** प्रकरणी बावधन पोलीस स्टेशन यांचेकडून दिनांक २६/५/२०२५ रोजी चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे. |
| मुद्दा क्रमांक १२ | उक्त प्रकरणी कारवाई केली नसल्यास त्यांची कारणमिमांसा | वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. |
| मुद्दा क्रमांक १३ | उक्त प्रकरणी कारवाई न करणा-या तसेच कारवाईस विलंब करणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली त्यांचा तपशिल | प्रश्न उद्भवत नाही. |

*****

## विषय :- महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती यांच्याकडे विभागीय सचिवांच्या साक्षीकरिता महिला आयोगाशी संबंधित मुद्यांची सविस्तर टिपणी (श्रीमती मयुरी हगवणे (जगताप) )

महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम १९९३ अन्वये आयोगाची स्थापना दिनांक २५ जानेवारी १९९३ रोजी करण्यात आली. भारताच्या संविधानाचे अनुच्छेद १४, १५ व १६ अन्वये स्त्रियांचे मूलभूत हक्क मिळवून देण्यास चालना देण्याच्या उद्देशाने आणि स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारण्याकरिता राज्याच्या धोरणाची आणि विशेषतः संविधानाच्या अनुच्छेद ३८, ३९, ३९ अ व ४२ मध्ये अंतर्भूत केलेली निदेशक तत्वे अंमलात आणण्यासाठी, तसेच स्त्रियांची अप्रतिष्ठा करणा-या प्रथांच्या बाबतीत अन्वेषण करुन योग्य त्या सुधारात्मक उपाययोजना करणे किंवा सुचविणे, स्त्रियांवर परिणाम करणा-या कायद्यांचे परिणामकारकरित्या संनियंत्रण व अंमलबजावणी करणे व स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे व उंचावणे या गोष्टींशी संबंधित असलेल्या सर्व बाबींवर शासनाला सल्ला देण्यासाठी आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. मा. आयोगाच्या कलम १० (२) नुसार न्याय चौकशी करण्याचा दिवाणी न्यायालयाचे अधिकार आहेत.

उपरोक्त पत्रात नमूद केल्यानुसार आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत चर्चा करण्याकरिता आयोग कार्यालयाशी निगडीत असलेला माहितीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| श्रीमती मयुरी हगवणे (जगताप) प्रकरण तपशील | | |
|---|---|---|
| मुद्दा क्रमांक १ | श्रीमती वैष्णवी हगवणे यांच्या मृत्यू प्रकरणाची संपूर्ण वस्तुनिष्ठ माहिती. | मयत श्रीमती वैष्णवी हगवणे यांना सासरच्या व्यक्तींकडून हुंड्यासाठी मानसिक, शारीरिक छळ करुन मृत्यूपूर्वी क्रुर वागणूक देऊन त्यांचा जाच करुन तिला इच्छापूर्वक मारहाण करुन तिचे मृत्यूस कारणीभूत झाले आहेत. या पार्श्वभूमीवर हगवणे कुटुंबाची मोठी सून श्रीमती मयुरीची माहिती खालील प्रमाणे आहे. |
| मुद्दा क्रमांक २ | प्रकरणाची पार्श्वभूमी | मयुरीचा विवाह झाल्यानंतर सासरे श्री राजेंद्र तुकाराम हगवणे व सासू श्रीमती लता राजेंद्र हगवणे व दिर श्री शशांक हगवणे यांनी फॉरच्यूनर गाडी व रोख रकमेची मागणी करुन मुलीला त्रास व मानसिक, शारीरिक छळ केल्याची प्रकरणाची प्रार्श्वभूमी आहे. |
| मुद्दा क्रमांक ३ | श्रीमती हगवणे यांच्या शवविच्छेदन अहवाल (पोस्टमोर्टम) | संबंधित नाही. |
| मुद्दा क्रमांक ४ | प्रकरणाची सद्य:स्थिती | वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बावधन पोलीस स्टेशन यांनी सदर प्रकरणी तपास केला असून, आरोपींविरुध्द दिनांक २२/५/२०२५ रोजी दोषारोप नंबर १०२/२०२५ अन्वये मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सो. न्यायालय क्र. ७ शिवाजी |

| | | |
|---|---|---|
| | | नगर, पुणे यांचे न्यायालयात दाखल करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. |
| मुद्दा क्रमांक ५ | यातील दोषींवर आजतागायत केलेल्या कारवाईचा अहवाल | वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बावधन पोलीस स्टेशन यांनी सदर प्रकरणी तपास केला असून, आरोपींविरुध्द FIR NO.०४८५ दि. ०६/११/२०२४ रोजी बी.एन.एस. कलम ७४, ११५, ३५२, २९६, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच दिनांक २२/५/२०२५ रोजी दोषारोप नंबर १०२/२०२५ अन्वये मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सो. न्यायालय क्र. ७ शिवाजी नगर, पुणे यांचे न्यायालयात दाखल करण्यात आला आहे.<br>सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. |
| मुद्दा क्रमांक ६ | हगवणे कुटुंबाची मोठी सून श्रीमती मयुरी हगवणे (जगताप) यांनी देखील सासरच्या मंडळीकडून होणा-या छळाबाबत या अगोदर दिलेल्या तक्रारींची माहिती. | मुद्दा क्रमांक ९ मध्ये सविस्तर माहिती देण्यात आली आहे. |
| मुद्दा क्रमांक ७ | तक्रार कोणाकडे केली होती यांचा तपशिल. | श्रीमती लता राजेंद्र जगताप (आई) व कु. मेघराज राजेंद्र जगताप (भाऊ) यांचा राज्य महिला आयोग कार्यालयास ई मेलद्वारे दिनांक ०६/११/२०२४ रोजी श्रीमती मयुरी हगवणे (जगताप) यांच्याबाबत अर्ज प्राप्त झाला होता. या व्यतिरिक्त त्यांनी संबंधित पोलीस स्टेशनकडे तक्रार केली आहे. |
| मुद्दा क्रमांक ८ | याबाबत पौंड पोलीस स्टेशन तसेच भरोसा सेलकडे तक्रार केली असल्यास त्याबाबतची माहिती. | महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे केलेल्या तक्रारीनुसार या कार्यालयाकडून दिनांक ०७/११/२०२४ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पौंड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण यांना प्रकरणाची चौकशी करुन कार्यवाही करणेबाबत पत्रव्यवहार करण्यात आला होता. तद्नंतर पौंड पोलीस स्टेशन यांनी बावधन पोलीस स्टेशनकडे प्रकरण वर्ग केला आहे. |
| मुद्दा क्रमांक ९ | राज्य महिला आयोगाकडे केलेल्या तक्रारींचा तपशील | **श्रीमती मयुरी हगवणे (जगताप) प्रकरण तपशील**<br>श्रीमती लता राजेंद्र जगताप (आई) व कु. मेघराज राजेंद्र जगताप (भाऊ) यांचा राज्य महिला आयोग कार्यालयास ई मेलद्वारे दिनांक ०६/११/२०२४ रोजी श्रीमती मयुरी हगवणे (जगताप) यांच्याबाबत अर्ज प्राप्त झाला होता. |

| | | |
|---|---|---|
| | | सदर तक्रार अर्जामध्ये त्यांनी नमूद केले होते की, मयुरीचा विवाह झाल्यानंतर सासरे श्री राजेंद्र तुकाराम हगवणे व सासू लता राजेंद्र हगवणे यांनी फॉरच्यूनर गाडी व रोख रकमेची मागणी करुन मुलीला त्रास देऊ लागले. यासाठी तिचे पती घरी नसतांना तिचा शारीरिक व मानसिक छळ करण्यात येत होता अशा घटना वारंवार घडत होत्या. सासरे, सासू, दिर व नणंद यांच्याकडून मारहाण करुन धमकी देण्यात आली की, तुझ्या आई व अपंग भावाला मारुन टाकू. आमच्याकडे बंदुका आहेत, आमच काही वाकडं करु शकत नाही माझा मेहूणा मोठा पोलीस अधिकारी आहे व आमच्या मागे मोठा राजकीय पाठींबा आहे, अशा धमक्या देऊन आमच्यावर दबाब आणण्याचा प्रयत्न करतात तरी सुध्दा आम्ही घरगुती सामंजास्याने हे वाद मिटवत होतो. त्यानंतर दि. १८/२/२०२४ रोजी पौंड पोलीस स्टेशन, ता. मुळशी येथे तक्रार दाखल केली. परंतू त्यावेळी तेथील पोलीस अधिका-यांनी समज देऊन मध्यस्थी केली. मयुरीच्या पतीवर तिला सोडून देण्यासाठी दबाब टाकण्यात आला, परंतू तिच्या पतीचा या गोष्टीला नकार असल्याने त्याचा राग मयुरीवर काढत होते. दिनांक ०६/११/२०२४ रोजी तिचे पती घरी नसताना सासू, सासरे, दिर व नणंद यांनी तिला शिवीगाळ करुन मारहाण केली, तसेच सास-याने व दिर शशांकने मारहाण करत तिच्या सोबत लज्जास्पद वर्तन केल्याची तक्रार आहे.<br><br>सदर प्रकरणी तक्रार अर्जानुसार दिनांक ०७/११/२०२४ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पौंड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण यांना कार्यवाही करुन अर्जदार यांना कळवावे, तसेच आयोगाला अवगत करावे. याबाबत ई मेलद्वारे पत्रव्यवहार करण्यात आला. त्यानुसार पौंड पोलीस स्टेशन यांनी FIR NO. ०४८५ दि. ०६/११/२०२४ रोजी बी.एन.एस. कलम ७४, ११५, ३५२, २९६, ३(५) नुसार नोंद केली असून सदर प्रकरण बावधन पोलीस स्टेशन हद्दीतील असल्याने पुढील कारवाईसाठी वर्ग करण्यात आला, असा अहवाल पाठवला आहे. तदनंतर या प्रकरणाबाबत श्रीमती मयुरी जगताप किंवा अन्य नातेवाईक यांनी आयोगाकडे कोणत्याही प्रकारे संपर्क साधला नाही किंवा अन्य |

| | | |
|---|---|---|
| | | तक्रार केली नाही. तथापि, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बावधन पोलीस स्टेशन यांनी सदर प्रकरणी सखोल तपास करुन आरोपी यांच्या विरुध्द दिनांक २२/५/२०२५ रोजी दोषारोप नंबर १०२/२०२५ अन्वये मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सो. न्यायालय क्र. ७ शिवाजी नगर, पुणे यांचे न्यायालयात दाखल करण्यात आला आहे. तसेच २६/५/२०२५ रोजी पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण यांनी सविस्तर अहवाल पाठविला आहे. त्यानुषंगाने दिनांक २८/०५/२०२५ रोजी सदर प्रकरणी गुन्ह्यात दोषारोप पत्र दाखल करण्यास पोलिसांकडून झालेल्या दिरंगाईची चौकशी करण्याबाबत मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना पत्र व्यवहार करण्यात आला आहे. |
| मुद्दा क्रमांक १० | उपरोक्त सर्व तक्रारी केल्या त्यावेळी त्या-त्या ठिकाणी कार्यरत असलेल्या अधिका-यांचे नाव व पदनामासह तपशिल | **श्रीमती अंजनी काकडे, समुपदेशक नि प्रकल्प** अधिकारी, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, वांद्रे, मुंबई |
| मुद्दा क्रमांक ११ | उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासन स्तरावरुन तसेच त्या-त्या ठिकाणी कार्यरत असलेल्या संबंधित अधिका-यां कडून कोणती दखल घेण्यात आली त्याबाबतचा तपशिल | श्रीमती लता राजेंद्र जगताप यांनी आयोगात सादर केलेल्या तक्रार अर्जानुसार दिनांक ०७/११/२०२४ रोजी संबंधित प्रकरणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पौंड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण यांना ई मेलद्वारे पत्रव्यवहार करण्यात आला. |
| मुद्दा क्रमांक १२ | उक्त प्रकरणी कारवाई केली नसल्यास त्यांची कारणमिमांसा | वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. |
| मुद्दा क्रमांक १३ | उक्त प्रकरणी कारवाई न करणा-या तसेच कारवाईस विलंब करणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली त्यांचा तपशिल | प्रश्न उद्भवत नाही. |

**महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती समोर विभागीय सचिवांची साक्ष**
**"हुंडाबळी" आणि "पुणे येथील श्रीमती वैष्णवी हगवणे यांच्या मृत्यूप्रकरणीशी संबंधीत माहिती**

**मुददा क्र. १ : वैष्णवी हगवणे यांचे मृत्यु प्रकरणाची वस्तुनिष्ठ माहिती.**

श्रीमती वैष्णवी हगवणे यांचे वडील श्री. आनंद ऊर्फ अनिल साहेबराव कस्पटे, वाकड, पुणे यांनी दिनांक १७/५/२०२५ रोजी बावधन पोलीस ठाणे येथे दिलेल्या फिर्यादी वरुन दाखल गुन्ह्यातील आरोपी (१) मयताचे पती : शशांक राजेंद्र हगवणे, वय २७ वर्षे (२) मयताची सासु : लता राजेंद्र हगवणे, वय ५४ वर्षे (३) मयताची ननंद : करीश्मा राजेंद्र हगवणे, वय ३१ वर्षे, (४) मयताचे सासरे : राजेंद्र तुकाराम हगवणे, वय ६३ वर्षे (५) मयताचे दीर : सुशील राजेंद्र हगवणे, वय २७ वर्षे यांनी दिनांक २८/४/२०२३ पासुन ते दिनांक १६/५/२०२५ रोजी दुपारी १६.३० या सुमारास मुक्ताई गार्डन जवळ, भुकुम, ता. मुळशी, जि. पुणे येथे राहते घरी मयत वैष्णवी हिस मृत्यूपुर्वी हुंड्यासाठी मानसिक, शारीरिक छळ करुन, क्रूर वागणुक देऊन तिचा जाच करुन, तिला इच्छापुर्वक मारहाण करुन तिच्या मृत्युस कारणीभुत झाले आहेत म्हणुन बावधन पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड येथे भारतीय न्याय संहितेच्या कलम ८०(२), १०८, ११५(२),३५२, ३५१(२), ११८(१), ३(५), ६१(२), २४९(ब), ८५, ४९, जे.जे. ॲक्ट, २०१५ कलम ७५, ८७, हुंडा प्रतिबंध अधिनियम कलम ४ अन्वये गुन्हा २०६/२०२५ नोंद करण्यात आला आहे.

**मुददा क्र. २ : प्रकरणाची पार्श्वभुमी.**

मयत वैष्णवी अनिल कस्पटे व आरोपी शशांक राजेंद्र हगवणे या दोघांचे प्रेमसंबंध असल्याने दोघांच्या संमतीने तसेच वैष्णवीचे नातेवाईक व शशांक यांचे नातेवाईक यांच्या पुढाकाराने वैष्णवी व शशांक यांचा शुक्रवार, दिनांक २८/४/२०२३ रोजी सनीज वर्ल्ड, सुसगाव, ता. मुळशी, जि. पुणे येथे मोठ्या थाटामाटात विवाह संपन्न झाला आहे. सदरच्या विवाहामध्ये शशांक याला हुंडा म्हणुन ५१ तोळे सोने, फॉर्च्युनर चारचाकी वाहन देण्यात आले आहे. वैष्णवी व शशांक यांना जनक, वय ९ महिने हा मुलगा आहे. वैष्णवी हिस तिच्या सासरकडील मंडळीकडून हुंड्यासाठी मानसिक, शारिरीक छळ करुन, क्रुर वागणुक देऊन तिचा जाच करुन, तिला इच्छापुर्वक मारहाण करुन तिच्या मृत्युस कारणीभुत झाले आहेत म्हणुन प्राप्त तक्रारी वरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**मुददा क्र. ३ : श्रीमती हगवणे यांचा शवविच्छेदन अहवाल** : सोबत छायांकीत प्रत जोडली आहे.

**मुददा क्र. ४ : प्रकरणाची सध्यस्थिती.**

दाखल गुन्ह्याच्या तपासामध्ये एकूण ११ आरोपी अटक करण्यात आले असून आरोपींकडे चौकशी सूरू असून चौकशी पूर्ण होताच आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र सादर करण्याची तजवीज ठेवली आहे.

मुददा क्र. ५ : यातील दोषींवर आजतागायत केलेल्या कारवाईचा अहवाल :

आरोपींची नावे :

१) मयताचे पती. शशांक राजेंद्र हगवणे वय-२७ वर्षे,
२) मयताची सासु लता राजेंद्र हगवणे वय ५४ वर्षे,
३) मयताची ननंद करीश्मा राजेंद्र हगवणे वय ३१ वर्षे,
४) मयताचे सासरे राजेंद्र तुकाराम हगवणे वय ६३ वर्षे
५) मयताचे दिर सुशील राजेंद्र हगवणे वय-२७ वर्षे, आरोपी क्रमांक १ ते ५ रा.मुक्ताई गार्डन जवळ, भुकूम, ता. मुळशी, जि.पुणे.
६) राहुल दशरथ जाधव. वय ४५ वर्ष, व्यवसाय शेती, रा हनुमान हायस्कुल जवळ,मु पो पुसेगाव, ता-खटाव, जि-सातारा..
७) प्रितम वीरकुमार पाटील. वय ४७ वर्ष, व्यवसाय शेती, रामु पो. कोगनोळी, ता-निपाणी, जि. बेळगाव राज्य-कर्नाटक
८) मोहन उत्तमराव भेगडे. वय ५९ वर्ष, व्यवसाय शेती रा- दिग्विजय कॉलनी, भेगडे वस्ती, वडगांव मावळ, पुणे. मो.नं-९५०३२७३२७६.
९) अमोल विजय जाधव वय ३५ वर्ष व्यवसाय शेती रामु पो. पुसेगांव, ता. खटाव, जि, सातारा.
१०) बंडु लक्ष्मण फाटक. वय-५५ वर्ष व्यवसाय-शेती रामु पो भांगरवाडी, लोणावळा, ता मावळ, जि पुणे.
११) निलेश रामचंद्र चव्हाण, वय ३४ वर्षे, धंदा-व्यवसाय, रा. औंदुबर सोसायटी, कर्वेनगर, पुणे, ४११ ०५२.

- आरोपी क्र. १ मयताचे पती हा मयतावर संशय घेवून शिवीगाळ व मारहाण करत होता, आरोपी २ मयताची सासु व ३ मयताची ननंद यांनी मयत हिस घालून पाडून बोलत असत, अपमानित करत होते. त्यांना दिनांक १७/५/२०२५ रोजी १७/५५ वा अटक करुन दिनांक २९/५/२०२५ रोजी पर्यत पोलीस कस्टडी घेण्यात आली आहे.
- आरोपी क्र. ४ सासरे व ५ दिर हे अपमानित करत होते. त्यांना दि. २३/०५/२०२५ रोजी अटक करण्यात आली असुन दिनांक ३/६/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली आहे.
- यातील आरोपी क्र. ६, ७, ८, ९ व १० यांनी आरोपी क्र. ४ व ५ यांना गुन्हा केल्यानंतर लपण्यासाठी आश्रय दिलेला होता व पळून जाणेसाठी मदत केली होती. त्यांना दिनांक २६/५/२०२५ रोजी २३.०० वा. अटक करण्यात आलेली असून आरोपी सध्या न्यायालयीन जामीनावर आहेत.
- यातील आरोपी क्रमांक ११ याने मयत वैष्णवी हिच्या बालकास तीन दिवस त्याचे घरात लपवून ठेवले होते. दरम्यान सदर बालकाची संरक्षण व काळजी घेतली नव्हती. तसेच

त्याने इतर आरोपींना गुन्हा करण्यासाठी अपप्रेरणा तसेच चिथावणी दिलेने त्यास दिनांक ३१/०५/२०२५ रोजी ०४.०८ वा. अटक करुन त्याची दिनांक ०३/६/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली आहे.

**मुददा क्र. ६ : हगवणे कुटुंबाची मोठी सुन श्रीमती मयुरी हगवणे (मयुरी जगताप) यांनी देखील सासरच्या मंडळीकडून होणा-या छळाबाबत या अगोदर दिलेल्या तक्रारीची माहिती.**

श्रीमती मयुरी सुशील हगवणे यांना दिनांक ५/११/२०२४ रोजी यातील आरोपी क्र. १ राजेंद्र तुकाराम हगवणे याने तक्रारदार श्रीमती मयुरी हगवणे (मयुरी जगताप) हिच्या छातीला हात लावून तेथील कपडे फाडून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले व आरोपी क्र. २, ३ व ४ यांनी तक्रारदार हिस अश्लील शिविगाळ करून हाताने मारहाण केली आहे. याअनुषंगाने तक्रारदार यांनी तक्रार दिल्याने पौड पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण येथे दिनांक ६/११/२०२४ रोजी ०२.४९ वा. गुन्हा रजि. नंबर ४८५/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ७४, ११५, ३५२, २१६, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्ह्याचा तपास (१) भाग्यश्री जाधव, महिला पोलीस उप निरीक्षक, पौड पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण. (दिनांक ०६/११/२०२४ ते दिनांक १३/०२/२०२५ पर्यंत) यांनी केला आहे. त्यानंतर सदर गुन्हा हा पौड पोलीस ठाणे पुणे ग्रामीण येथून नवनिर्मीत बावधन पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड यांचे कडे अभिलेख वर्ग झाल्याने दाखल गुन्ह्याचा पुढील तपास हा श्री. देविदास फड, पोलीस उप निरीक्षक, बावधन पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड यांचेकडे देण्यात आला होता. त्याचा तपास करुन आरोपींविरुध्द दिनांक २३/५/२०२५ रोजी दोषारोपपत्र क्रमांक १०२/२०२५ अन्वये मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट नंबर ७, शिवाजीनगर, पुणे यांचे न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले आहे

**मुद्दा क्र. ७ : तक्रार कोणाकडे केली होती याचा तपशील.**

उपरोक्त मुद्दा क्रमांक (६) प्रमाणे.

**मुद्दा क्र. ८ : या बाबत पौड पोलीस स्टेशन तसेच भरोसा सेल कडे तक्रार केली असल्यास त्या बाबतची माहिती.**

उपरोक्त मुद्दा क्रमांक (६) प्रमाणे.

**मुद्दा क्र. ९ : राज्य महिला आयोगाकडे केलेल्या तक्रारीचा तपशील :** गृह विभागाशी संबंधीत नाही.

**मुद्दा क्र. १० : उपरोक्त सर्व तक्रारी केल्या त्यावेळी त्या ठिकाणी कार्यरत असलेल्या अधिका-यांचे नाव, पदनामासह तपशील.**

पोलीस विभागाकडील अधिका-याचा तपशील :

१) प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक संतोष गिरीगोसावी, पौड पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण.

२) तपास अधिकारी भाग्यश्री जाधव, महिला पोलीस उप निरीक्षक, पौड पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण.

**मुद्दा क्र. ११ : उपरोक्त तक्रारीचे अनुषंगाने शासन स्तरावरुन तसेच त्या त्या ठिकाणी कार्यरत असलेल्या संबंधीत अधिकारी यांचेकडुन कोणती दखल घेण्यात आली त्याबाबतचा तपशील**

प्रस्तुत प्रकरणाशी संबंधीत तक्रार शासन स्तरावर प्राप्त नाही. तथापि, पौड पोलीस स्टेशन येथे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती मुद्दा क्रमांक (६) मध्ये नमूद करण्यात आली आहे.

**मुददा क्र. १२: उक्त प्रकरणी कारवाई केली नसल्यास त्याची कारणमीमांसा व मुद्दा क्र. १३ : उक्त प्रकरणी कारवाई न करणा-या तसेच कारवाईस विलंब करणा-या अधिकारी यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली त्याचा तपशील.**

पौड पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण गुरनं. ४८५/२०२४ भान्यासं. क. ७४, ११५, ३५२, २९६, ३(५) अन्वये दाखल गुन्हा बावधन पोलीस ठाण्यास वर्ग झालेवर सदर गुन्ह्यामध्ये मा. न्यायालयात वेळेत दोषारोपपत्र सादर न केल्याने तपासी अंमलदार श्री. देविदास फड, पोलीस उप निरीक्षक, बावधन पोलीस ठाणे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली होती. सदर नोटिसच्या अनुषंगाने त्यांनी खुलासा सादर केलेला होता. सदर खुलासा असमाधानकारक असल्याने त्याची चौकशी सहायक पोलीस आयुक्त, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचकडे सोपवली असुन सदर प्रकरणी सध्या सपोआ वाकड यांचेकडे चौकशी चालू आहे.

*****

# परिशिष्ट – “ब”

# (समितीच्या बैठकांचा उपस्थिती पट)

## बैठकीची उपस्थिती

महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती (Committee on Rights and Welfare of Women and Child) ची बैठक सोमवार, दिनांक २६ मे, २०२५ रोजी दुपारी १.०० वाजता, २० वा मजला, कक्ष क्र.२००३, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :-

## उपस्थिती

१. श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्रीमती रंजना जाधव, वि.स.स.

३. श्रीमती सना मलिक, वि.स.स.

४. श्रीमती चित्रा वाघ, वि.प.स.

५. डॉ. प्रज्ञा सातव, वि.प.स.

६. श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.

**<u>महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय</u>**

१. श्रीमती मेघना तळेकर, सचिव-२.

२. श्रीमती प्रज्ञा उघाडे, कक्ष अधिकारी.

----------

## बैठकीची उपस्थिती

महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती (Committee on Rights and Welfare of Women and Child)ची बैठक सोमवार, दिनांक ९ जून, २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता, १९ वा मजला, कक्ष क्र.१९०१, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती.सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

### उपस्थिती

१. श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्रीमती विद्या ठाकूर, वि.स.स.

३. ॲड. श्रीजया चव्हाण, वि.स.स.

४. श्रीमती स्नेहा दुबे, वि.स.स.

५. श्रीमती सना मलिक, वि.स.स.

६. श्री. महेश सावंत, वि.स.स.

७. डॉ. ज्योती गायकवाड, वि.स.स.

८. श्रीमती चित्रा वाघ, वि.प.स.

९. डॉ. प्रज्ञा सातव, वि.प.स.

१०. श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

१. श्रीमती मेघना तळेकर सचिव-२.
२. श्री.दामोदर गायकर, अवर सचिव (समिती)
३. श्रीमती प्रज्ञा उघाडे, कक्ष अधिकारी.

**विभागीय अधिकारी :**

१. श्री. अनुप कुमार सिंह, प्रधान सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. डॉ.अनुप यादव, सचिव, महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

३. श्रीमती रश्मी शुक्ला, पोलीस महासंचालक.

४. श्रीमती अस्वती डोरजे, अतिरिक्त पोलीस महासंचालक, महिला व बालकांविरुध्द अत्याचार कक्ष.

५. श्रीमती नयना गुंडे, आयुक्त, महिला व बालविकास विभाग.

६. श्री. व्ही. के. चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड.

७. श्री. बी. जी. पाटारे, सहायक पोलीस आयुक्त, कोथरुड विभाग, पुणे शहर.

८. श्री. विशाल हिरे, सहायक पोलीस आयुक्त, Crime Women cell, पिंपरी चिंचवड.

९. श्री. सुनिल कुरोडे, सहायक पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड.

१०. श्री. विशाल गायकवाड, उप पोलीस आयुक्त, झोन II, पिंपरी चिंचवड.

११. श्री. सुनिलकुमार पुजारी, उप विभागीय पोलीस अधिकारी, हवेली.

१२. श्री. संतोष डी. गिरीगोसावी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक.

१३. श्रीमती भाग्यश्री जाधव, पोलीस उप निरीक्षक (PSI)

१४. श्री.अनिल विभूते, पोलीस निरीक्षक, बावधन.

१५. डॉ. पद्मश्री बायनडे, सदस्य सचिव, राज्य महिला आयोग.

१६. श्री. हेमंतकुमार मोहन, कक्ष अधिकारी, गृह विभाग, पोल-१३.

समितीने "पुणे येथील वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणाच्या अनुषंगाने राज्यात महिलांवरील अत्याचार तसेच हुंडाबळी प्रकरणाबाबत" सचिव, महिला व बालविकास विभाग व प्रधान सचिव, गृह विभाग यांची साक्ष घेतली.

## बैठकीची उपस्थिती

महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती (Committee on Rights and Welfare of Women and Child) ची बैठक बुधवार, दिनांक १६ जुलै, २०२५ रोजी दुपारी २-३० वाजता, २० वा मजला, कक्ष क्र.२००३, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :-

### उपस्थिती

१. श्रीमती चित्रा वाघ, वि.प.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख्य
२. ॲड. श्रीजया चव्हाण, वि.स.स.
३. श्रीमती स्नेहा दुबे, वि.स.स.
४. श्रीमती रंजना जाधव, वि.स.स.
५. श्रीमती मंजुळा गावित, वि.स.स.
६. श्रीमती सरोज अहिरे, वि.स.स.
७. श्रीमती सना मलिक, वि.स.स.
८. श्री.महेश सावंत, वि.स.स.
९. डॉ.ज्योती गायकवाड, वि.स.स.
१०. श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.
११. श्री. किरण सरनाईक, वि.प.स.
१२. डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स. - **विशेष निमंत्रित**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

१. श्रीमती मेघना तळेकर, सचिव-२.
२. श्री.दामोदर गायकर, अवर सचिव (समिती)
३. श्रीमती प्रज्ञा उघाडे, कक्ष अधिकारी.

समितीने उक्त बैठकीत "पुणे येथील वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणाच्या अनुषंगाने राज्यात महिलांवरील अत्याचार तसेच हुंडाबळी प्रकरणाबाबत" पहिल्या प्रारूप अहवालावर विचारविनिमय करून तो संमत केला.

----------

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई